



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ११५ * नांदेड * शुक्रवार, दि. १ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

गोदातीर समाचार



आज महाराष्ट्र दिन व कामगारदिन.
त्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!
–संपादक

**सुट्टीची सूचना**

आज महाराष्ट्रदिन व कामगार दिनानिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. २ मे २०२६ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.
– व्यवस्थापक

# विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध होणार

## शिवसेनेकडून बच्चू कडू, निलम गोऱ्हे तर राष्ट्रवादीकडून झिशान सिद्धीकीला संधी

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असून ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत भाजपकडून सहा उमेदवारांचे अर्ज दाखल, शिंदेंच्या सेनेकडून दोन तर राष्ट्रवादीकडून झिशान सिद्दीकी आणि ठाकरेंच्या सेनेकडून अंबादास दानवेंचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित निवडणूक तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार आहे. भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. विधान परिषदेच्या १० जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. १२ मे रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल. तर १२ मे रोजीच निकाल जाहीर होणार आहे.

विधान परिषदेच्या १० जागांसाठीची निवडणूक बिनविरोध होणार असल्याचं निश्चित झालं आहे. कुठल्याही पक्षाने अकरावा उमेदवार न दिल्याने विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध होणार आहे. तीन अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केला असला तरी त्यांना १० आमदारांची सूचक म्हणून सही नसल्याने या संबंधित अपक्ष उमेदवारांचे अर्ज बाद ठरवले जातील. भाजपकडून ६, शिवसेनेकडून २, राष्ट्रवादी काँग्रेसकडून १ आणि मविआकडून १ उमेदवारांचा अर्ज दाखल झाला आहे.

### विधान परिषदेच्या निवडणुकीतून काँग्रेसची माघार, अंबादास दानवेंना पाठिंबा

शिवसेना ठाकरे गटाने अंबादास दानवे यांना विधानपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर केल्यानंतर महाविकास आघाडीत मतभेद उफाळून आल्याचे चित्र समोर आले होते. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सुरुवातीला विधानपरिषद निवडणुकीसाठी काँग्रेस स्वतः चा उमेदवार देणार असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, आता काँग्रेसने भूमिका बदलत विधानपरिषद निवडणुकीतून माघार घेतली असून महाविकास आघाडीने अंबादास दानवे यांना पाठिंबा दर्शविला आहे.

# महापालिकेची सर्वसाधारण सभा १५ मिनिटांत तहकूब; नगरसेवक आता वाढीव अर्थसंकल्पाचा अभ्यास करणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिका आयुक्तांनी सादर केलेल्या १ हजार ३६० कोटींच्या वार्षिक अर्थसंकल्पामध्ये स्थायी समितीने विकास कामाच्या नावावर ११७ कोटींची वाढीव तरतूद केली. या वाढीव अर्थसंकल्पाची नगरसेवकांनी चर्चा न करता अभ्यास करण्यासाठी वेळ मागितल्याने ३० एप्रिल रोजी बोलावण्यात आलेली सर्वसाधारण सभा १५ मिनिटांत तहकूब करण्यात आली. नगरसेवकांना वाढीव वार्षिक अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्यासाठी वेळ वाढवून देण्यात आला.

महानगरपालिकेतील सर्वसाधारण सभा ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजातील एक अत्यंत महत्त्वाची बैठक असते. त्यात शहराच्या विकासासंबंधी निर्णय, वार्षिक अर्थसंकल्प मंजूर करणे, विविध योजना, प्रकल्प आणि धोरणे ठरविणे, महापालिकेच्या कामकाजावर चर्चा व आढावा घेणे, स्थायी समिती व इतर समित्यांच्या अहवालावर विचार करणे, नवीन नियम कर किंवा सुधारणा मंजूर करण्यासाठी आयोजित करण्यात येते. ही सभा महापालिकेच्या सर्व महत्त्वाच्या निर्णयांची अंतिम मंजुरी देणारी आणि शहराच्या प्रशासनाचे दिशा निर्देशांक करणारी बैठक असते. परंतु तसे घडताना नांदेड महानगरपालिकेत दिसत नाही. यापूर्वी महापालिका निवडणुकीनंतर पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. त्यात ४ विषयांवर चर्चा करण्याचा फार्स करण्यात आला. विरोधी पक्षातील नगरसेवक चर्चेची मागणी करीत राहिले. मात्र सत्ताधारी भाजप - शिवसेना नगरसेवक, महापौर यांनी गोंधळातच ही सभा तहकूब केली. ३० एप्रिल रोजी महापालिकेची सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. महापौर कविता मुळे यांनी सभेला सुरुवात केली. यावेळी स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी वाढीव वार्षिक अर्थसंकल्पावर त्यांचे मनोगत व्यक्त केले. त्यानंतर नगरसेवकांच्या मागणीनुसार वाढीव अर्थसंकल्पावर अभ्यास करण्यासाठी अभ्यासू नगरसेवकांना वेळ वाढवून देण्यात येत असल्याचे जाहीर करून ही सभा तहतूक करण्यात आली. शहरात नागरिकांना कोणत्याच अडचणी नाहीत, सर्व विकासकामे झाली आहेत आणि नांदेड शहरात सर्व सुरळीत आहे असा निष्कर्ष या १५ मिनिटांच्या सर्वसाधारण सभेच्या तहकूबीवरून दिसून येत आहे.

नांदेड वाघाळा महापालिकेतील नगरसेवकांनी या वाढीव अर्थसंकल्पावर चर्चा केलीच नाही. उलट अभ्यास करण्याच्या नावावर वेळ वाढवून मागितला व १५ मिनिटांत सभा तहकूब करण्यात आली. नांदेडवासीय आतुरतेने कोणकोणते विकासाचे निर्णय ही सभा घेते, याकडे डोळे लावून बसले होते. मात्र सत्ताधारी व विरोधी नगरसेवकांनी स्वहिताचा निर्णय घेतला असल्याचे या सभेच्या तहकूबीवरून निदर्शनास येत आहे.

### मूळ अर्थसंकल्पामध्ये ११७ कोटींची वाढीव तरतूद –सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले

महापालिका आयुक्तांनी २०२६-२७ साठी १ हजार ३०७ रुपयांचा वार्षिक अर्थसंकल्प घोषित केला होता. त्यात विविध विकास कामांसाठी ११७ कोटी रुपयांची वाढ दर्शवून आता १ हजार ४२४ रुपयांचा अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत सादर केला आहे. नगरसेवकांना वार्ड विकासासाठी तीस कोटींची तरतूद करण्यात आली आहे. पाणीपुरवठा, स्मशानभूमी, कब्रस्तान साठी निधी, गुरुद्वारांमध्ये दर्शनासाठी येणाऱ्या यात्रेकरूंच्या सुविधासाठी उपाययोजना साठी निधी, तसेच महापुरुषांच्या पुतळ्यांसाठी ३ ते ५ कोटी रुपयांची तरतूद व कचऱ्यापासून वीज व गॅस निर्मितीसाठी वाढीव प्रकल्प, असा एकूण ११७ कोटी रुपयांची वाढीव तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे, अशी माहिती स्थायी समिती सभापती वीरेंद्रसिंग गाडीवाले यांनी दिली.

# नांदेड जिल्ह्यातील तीन तालुक्यांत नवीन न्यायालयीन इमारतींच्या कामांना शासनाची मंजुरी; ८० कोटींहून अधिक निधीची तरतूद

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील न्यायव्यवस्थेचे सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने निर्णय घेतला आहे. नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद, उमरी आणि बिलोली या तीन तालुक्यांमध्ये नवीन न्यायालयीन इमारती आणि निवासस्थानांच्या बांधकामासाठी शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. या तिन्ही कामांसाठी एकूण ८० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली असून, यामुळे या भागातील पक्षकार आणि कर्मचाऱ्यांची मोठी सोय होणार आहे.

धर्माबाद येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्यासाठी शासनाने ४१.७४ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. या नियोजित इमारतीमध्ये स्टिल्ट, तळमजला आणि दोन मजल्यांचे बांधकाम करण्यात येणार आहे. उच्च न्यायालयाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, ३० एप्रिल २०२६ रोजी शासनाने या कामास प्रशासकीय मान्यता दिली असून यामुळे धर्माबाद तालुक्यातील न्यायालयीन कामांना गती मिळणार आहे.

उमरी तालुक्यासाठी देखील शासनाने ३७.१८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून येथे चार कोर्ट हॉल असलेली भव्य इमारत उभारली जाणार आहे. या इमारतीमध्ये तळमजला अधिक दोन मजले अशा स्वरूपाचे बांधकाम असेल, ज्यात दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्यासाठी ३ आणि महिला व बाल विकास (डब्ल्यूडीसी) विभागासाठी १ असे एकूण ४ कोर्ट हॉल उपलब्ध होतील. या इमारतीमुळे उमरी येथील न्यायालयीन कामकाजाचा दर्जा सुधारण्यास मदत होईल.

तसेच बिलोली येथे जिल्हा न्यायाधीशांसाठी दोन नवीन निवासस्थाने बांधण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या निवासी कामासाठी ३९४.२५ लक्ष (३.९४ कोटी) रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या तिन्ही कामांना प्रशासकीय मान्यता देताना शासनाने काही अटींचे पालन करण्याचे निर्देश दिले असून, यात वास्तुविशारदांकडून नकाशा मंजूर करणे आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नांदेड यांच्या सहमतीने तरतुदी अंतिम करणे यांचा समावेश आहे.

# ओबीसींच्या सर्वसमावेशक विकासावर शासनाचा भर -ना. अतुल सावे

### रोजगार मिळविण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा –पालकमंत्री

### 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळावा' उत्साहात




**नांदेड (प्रतिनिधी)–** इतर मागास वर्गाच्या (ओबीसी) आणि बहुजन समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. 'ओबीसींचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा विशेष भर' असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन विकास, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

नांदेड येथील विष्णू नगर भागातील शंकरराव चव्हाण सभागृहात इतर बहुजन कल्याण विभागाच्यावतीने आयोजित 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्यात' पालकमंत्री सावे अध्यक्षीय पदावरून बोलत होते. या कार्यक्रमास माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. राजेश पवार, आ. बाबुराव कोहळीकर, महापौर कविता मुळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे, म.राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. वसंत माने, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलींद नारिंगे, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे संचालक प्रताप पवार, वनार्टीचे संचालक प्रशांत वावगे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक तेजस माळवदकर, सहायक संचालक सचिन खुने यांच्यासह परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर येथील संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मंत्री अतुल सावे म्हणाले की, समाजातील तळागाळातील घटकांना आणि विशेषतः ओबीसी प्रवर्गातील तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे. महामंडळांच्या माध्यमातून सुलभ कर्ज उपलब्ध करून देणे आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आजच्या या कर्ज वाटप मेळाव्याचा लाभ घेऊन तरुणांनी स्वतःचा व्यवसाय उभा करावा आणि राज्याच्या विकासात आपले योगदान द्यावे. रोजगार मिळविण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा, असे आवाहन मंत्री सावे यांनी केले.

या ऐतिहासिक कार्यक्रमात मार्गदर्शन करताना खा. अशोक चव्हाण म्हणाले, वाढत्या स्पर्धेच्या काळात रोजगार आणि व्यावसायिक गुणवत्तेची गरज अधोरेखित झाली असून, 'विकसित भारत २०४७' चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. उद्योग उभारणीसाठी गरिबांना येणारी 'मार्जिन मनी'ची अडचण सोडवण्यासाठी सध्या १४ महामंडळे कार्यरत आहेत. आता गावागावांत सुविधा केंद्रे सुरू करून नाविन्यपूर्ण व्यवसायांना चालना दिली जात आहे. ओबीसी आणि इतर मागासवर्गीयांमधील जवळपास ६११ उपजातींना न्याय देण्याच्या उद्देशाने ३१ मार्च २०२६ पर्यंत तब्बल ७० हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना कर्जवाटप करण्यात आले आहे. विशेष म्हणजे यातील ७० ते ७५ टक्के निधी परतफेड होत असून, हे या योजनेचे मोठे यश असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने झाली. प्रास्ताविक इतर मागास बहुजन कल्याण विभाग संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू दासरी यांनी केले. व्यवस्थापकीय संचालक प्रताप पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.





# मुंबईहून सुटणारी वंदे भारत एक्सप्रेस आज रद्द



**नांदेड (प्रतिनिधी)–** मुंबई येथून दि. १ मे २०२६ रोजी सुटणारी गाडी क्रमांक २०७०६ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - हजूर साहिब नांदेड वंदे भारत एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे.

गाडी क्रमांक २०७०५ हजूर साहिब नांदेड -छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वंदे भारत एक्सप्रेस दि. ३० एप्रिल २०२६ रोजी रद्द करण्यात आली होती.

या गाडीला रेक उपलब्ध नसल्यामुळे आज दि. १ मे २०२६ रोजीही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - हजूर साहिब नांदेड वंदे भारत एक्सप्रेस ही गाडी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन रेल्वे विभागाकडून करण्यात आले आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# महाराष्ट्रदिन आणि मराठी भाषाचे भवितव्य

आज महाराष्ट्र दिन आहे. महाराष्ट्र म्हटल्यानंतर मराठी भाषा असलीच पाहिजे व ती सर्वांना आलीच पाहिजे असा हट्ट महाराष्ट्रातील नेत्यांनी धरला आहे आणि तो योग्यच आहे. परंतु यामुळे इतर राज्यांतून महाराष्ट्रात येऊन राहिलेल्या लोकांना मात्र ही बाब पचत नाही. म्हणून केवळ रिक्षावाल्यांनाच मराठी भाषा अनिवार्य करून उपयोग नाही तर ही भाषा महाराष्ट्रात राहणाऱ्या सगळ्यांनाच अनिवार्य केली पाहिजे असा हट्ट धरणाऱ्या लोकांच्या महाराष्ट्रामध्ये मात्र मराठीची अवस्था केविलवाणी झालेली आहे. मराठी भाषेबाबत पुणेकर मंडळी नेहमी बोलत असतात, परंतु मराठवाडा, विदर्भ, कोकण या ठिकाणच्या मराठी भाषेबाबत मात्र ते मूग गिळून असतात. एकीकडे महाराष्ट्राची बोली आहे तर दुसरीकडे प्रमाणभाषा व आता अभिजात दर्जा प्राप्त झालेली ही मराठी आहे. असे असले तरी अमराठी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मात्र मराठीचे अध्यापन करणे त्यांना अपमानकारक वाटते, अशांना सुद्धा त्यांची जागा दाखवून देणे गरजेचे आहे. मराठीसाठी महाराष्ट्र शासनाची राज्य मराठी विकास संस्था, साहित्य संस्कृती मंडळ, मराठी कोश मंडळापासून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या गावागावांतील शाखेपर्यंत अनेक संस्था प्रयत्न करत आहेत. साहित्य संमेलने व चर्चासत्रांतही त्यावर चर्चा होत असतात, परंतु हे सर्व शासनाच्या तिजोरीवर डोळा ठेवूनच. भाषेच्या प्रमाणीकरणासाठी ध्येय-धोरणांमध्ये अनेकदा बदलही घडवून आणले गेले आहेत. अनेकदा शुद्धलेखनापासून प्रमाणलेखनापर्यंतच्या नियमांत बदल करण्यात आले आहेत. तीच बाब मराठी कोश मंडळाने, राज्य मराठी विकास संस्थेने आणि साहित्य संस्कृती मंडळानेही स्वीकारली आहे, हे स्वागतार्ह आहे. तरीही बोली भाषा आणि प्रमाण भाषा यांच्यातील द्वंद्व मात्र कायमच आहे जे मराठी भाषेच्या विकासामध्ये अडथळा आणत आहे. वास्तविक पाहता प्रमाण मराठी आणि बोली यांचा परस्पर संबंध नव्या पद्धतीने मांडता येणे शक्य आहे. दैनंदिन व्यवहारात जी बोलली जाते ती बोली. तीच खरी भाषा, ती शुद्ध किंवा अशुद्ध असण्याचा प्रश्नच नसतो. मात्र ग्रंथ, नियम, कायदे आणि जिथे बहुभाषक एकत्र येतात, तिथे वापरावयाची भाषा ती प्रमाण भाषा असते. मराठी ही महाराष्ट्राची प्रमाण भाषा आहे. महाराष्ट्रातील जनतेचा व्यवहार मराठीतून चालतो, पण शासकीय कार्यालयांमध्ये मात्र वेगळीच भाषा वापरली जाते. महाराष्ट्राच्या विविध भागांत विविध बोली बोलल्या जातात त्याचा विकास देखील करणे तेवढेच गरजेचे आहे. मराठी भाषेमध्ये एवढे वैविध्य आहे तसे इतर भाषांमध्ये जाणवत नाही. उदाहरणादाखल खानदेशात अहिराणी, मराठवाड्यात मराठवाडी, मालवणमध्ये मालवणी, तर कोल्हापूरकडे कोल्हापुरी. या प्रादेशिक बोली आहेत, तर भिल्ली, लाडशाखी, गुजरी, अहिराणी, गोरमाटी, पावरी, परदेशी या प्रकारच्या जातीजमातींच्या बोली या सामाजिक बोली आहेत. विविध प्रादेशिक आणि समाजबोली बोलणाऱ्यांमधील भाषा व्यवहार सुकर व्हावेत, यासाठी विविध बोलींतील प्रमाण शब्दांबाबत नियमावली करून प्रमाण मराठी भाषा तयार करणे आवश्यक आहे. प्रमाण भाषा ही एखाद्या विशिष्ट जातीची किंवा समाजाची किंवा एखाद्या विशिष्ट भूभागाची भाषा नसते, ती ग्रंथांची भाषा असते. त्यामुळे या सर्व बोलींतील शब्दांचा साठा हा प्रमाण मराठीचे वैभव वाढविणारा आहे. असे असूनदेखील मराठीच्या बृहत्कोशात मराठवाडी भाषेची स्वतंत्र बोली म्हणून अभ्यास व्हायला हवा, पण तसे होत असल्याचे दिसत नाही. असे केल्याने अर्थात या बोलींतील शब्द आणि वाक्यांच्या समावेशामुळे मराठीची शुद्धता हरपेल, ही काहीजणांना वाटणारी भीती निराधार आहे नव्हे तर तो त्यांचा अहंकार आहे. विविध बोलींतील, लेखक, कवी, कथाकार, नाटककार आपल्या जीवनानुभवांचे चित्रण करताना त्यांच्या बोलीतील शब्द सहजपणे वापरतात. मग अशा शब्दांना प्रमाण मराठीने आपल्या कोशात स्थान दिले नाही तर मराठी परिपूर्ण प्रमाण भाषा होऊ शकणार नाही. कोणतीही प्रमाण भाषा इतर बोलींतील आणि इतर प्रमाण भाषांतील प्रचलित शब्द आपल्यात सामावून घेत असतेच. इंग्रजीने तसे केले आहे, मराठीनेही तेच करायला हवे. मात्र तिची शुद्धता टिकविण्याच्या नादात ते टाळले जाते. म्हणूनच मराठी टिकवावयाची असेल तर हे धोरण स्वीकारावे लागेल. यासंदर्भात शासनाने तज्ज्ञांची समिती स्थापन करून पुढाकार घ्यावा आणि महाराष्ट्रातील विविध ठिकाणी बोलल्या जात असलेल्या मराठी भाषेचा किंवा त्या भाषांतील शब्दांचा समावेश प्रमाणभाषेत करून सर्वांचाच विकास कसा होईल यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखावा. असे झाल्यासच मराठी भाषेचा खऱ्या अर्थाने विकास होईल आणि खऱ्या अर्थाने महाराष्ट्र दिन साजरा केला जाईल.

# गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान



वैशाख महिन्यातील पौर्णिमा हा दिवस भारतीय तसेच जागतिक सांस्कृतिक परंपरेत अत्यंत पवित्र, चिंतनशील आणि मूल्यप्रधान मानला जातो. याच दिवशी मानवजातीला करुणा, अहिंसा, समता आणि प्रज्ञेचा सार्वत्रिक संदेश देणाऱ्या गौतम बुद्ध यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण हे तीनही महत्त्वपूर्ण प्रसंग घडल्याची परंपरा आहे. त्यामुळे हा दिवस केवळ धार्मिक विधींचा उत्सव नसून मानवी मूल्यांचे पुनरुज्जीवन करणारा, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारा आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरतो. आजच्या वेगवान, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत, जिथे माणूस भौतिक प्रगतीच्या मागे धावताना मानसिक शांतता, नैतिकता आणि सामाजिक समतेपासून दूर जात आहे, अशा परिस्थितीत गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान अधिकच सुसंगत आणि आवश्यक ठरते.

गौतम बुद्धांचा जन्म इ. स. पूर्व सहाव्या शतकात लुंबिनी येथे शाक्यकुलात झाला. त्यांचे बालनाव सिद्धार्थ होते. राजघराण्यातील ऐश्वर्यपूर्ण वातावरणात त्यांचे बालपण गेले, परंतु त्यांच्या संवेदनशील मनाला जीवनातील दुःखाचे वास्तव सतत अस्वस्थ करीत होते. वृद्धत्व, रोग आणि मृत्यू या अपरिहार्य सत्यांचे दर्शन झाल्यानंतर त्यांच्या मनात जीवनाच्या मूलभूत प्रश्नांची तीव्र जिज्ञासा निर्माण झाली. जीवन दुःखमय का आहे? आणि या दुःखातून मुक्तीचा मार्ग कोणता? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी राजवैभवाचा त्याग करून संन्यासाचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ वैयक्तिक नव्हता, तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी केलेली एक महान साधना होती. ज्ञानाच्या शोधात त्यांनी विविध गुरूंकडून शिक्षण घेतले, कठोर तपश्चर्या केली, परंतु त्यांना अपेक्षित समाधान मिळाले नाही. शेवटी त्यांनी अतिभोग आणि अतितप या दोन्ही टोकांच्या मार्गांचा त्याग करून 'मध्यम मार्ग' स्वीकारला. बोधीवृक्षाखाली गहन ध्यानसाधना करून त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' म्हणजेच 'जागृत' झाले. या ज्ञानप्राप्तीने त्यांनी मानवी जीवनाचे सत्य उलगडले आणि दुःखातून मुक्तीचा मार्ग दाखवला.

बुद्धांचे तत्त्वज्ञान मूलतः मानवकेंद्रित आहे. त्यांनी कोणत्याही अलौकिक शक्तीवर अवलंबून राहण्याऐवजी मानवी अनुभव, विवेक आणि आचरण यांना महत्त्व दिले. त्यांच्या शिकवणीत मनुष्य स्वतःच्या कर्माचा निर्माता आहे आणि त्याच्या कृतींवरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे, ही स्पष्ट भूमिका दिसते. हा दृष्टिकोन माणसाला स्वावलंबन, जबाबदारी आणि नैतिकतेची जाणीव करून देतो.

गौतम बुद्धांनी मांडलेली 'चार आर्य सत्ये' ही त्यांच्या तत्त्वज्ञानाची मूलभूत आधाररचना आहे. जीवनात दुःख आहे, दुःखाचे कारण आहे, दुःखाचा अंत शक्य आहे आणि त्या अंताचा मार्ग आहेत ही चार सत्ये ती मानवी जीवनाचे वास्तव स्पष्ट करतात. बुद्धांनी दुःखाचे मूळ 'तृष्णा' किंवा अनियंत्रित इच्छांमध्ये पाहिले आहे. ही तृष्णा माणसाला सतत असमाधानी ठेवते आणि दुःखाचे कारण बनते. म्हणूनच तृष्णेवर नियंत्रण मिळवणे आणि मनाला संतुलित ठेवणे हे सुखी जीवनासाठी आवश्यक आहे. या दुःखातून मुक्त होण्यासाठी त्यांनी 'अष्टांगिक मार्ग' सांगितला आहे. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी या आठ घटकांचा समावेश असलेला हा मार्ग व्यक्तीला नैतिकता, मानसिक शुद्धता आणि प्रज्ञेच्या दिशेने नेतो. हा मार्ग केवळ आध्यात्मिक उन्नतीसाठी नसून तो दैनंदिन जीवनातही अत्यंत उपयुक्त आहे. या मार्गाचा अवलंब केल्यास व्यक्तीच्या विचारांमध्ये स्पष्टता, वर्तनात संतुलन आणि जीवनात समाधान निर्माण होते.

बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान सामाजिक समतेवर आधारित आहे. त्यांनी जात-पात, वर्णभेद आणि सामाजिक विषमता यांचा ठामपणे विरोध केला. त्यांच्या मते, माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या कर्मावर अवलंबून असते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारी होता आणि आजही सामाजिक न्यायाच्या चळवळींना दिशा देतो. त्यांनी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा मूलमंत्र दिला, जो सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतो.

बुद्धांनी अहिंसा, करुणा, मैत्री, सत्य आणि क्षमा यांसारख्या मूल्यांचा प्रचार केला. त्यांच्या मते, खरा धर्म म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवून त्याच्या कल्याणासाठी कार्य करणे. 'करुणा' हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. प्रत्येक जीवामध्ये समानतेने पाहणे आणि त्याच्याशी सहानुभूतीने वागणे हीच खरी मानवता आहे. आजच्या आधुनिक युगात माणूस भौतिक प्रगतीच्या शर्यतीत इतका गुंतला आहे की त्याने मानसिक शांतता आणि नैतिक मूल्ये गमावली आहेत. ताणतणाव, नैराश्य, असंतोष आणि स्पर्धा यामुळे मानवी जीवन अधिकच क्लिष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत बुद्धांचे 'मध्यम मार्ग' आणि 'संतुलित जीवन' यांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यांनी सांगितलेला मार्ग संयम, सजगता आणि संतुलन यांचा आहे, जो व्यक्तीला अंतःशांती आणि समाधान देतो. पर्यावरणाच्या संदर्भातही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी सर्व जीवांबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे ही त्यांच्या शिकवणीची एक महत्त्वाची बाजू आहे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर हा दृष्टिकोन अत्यंत उपयुक्त ठरतो.

बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान केवळ वैयक्तिक जीवनापुरते मर्यादित नसून ते सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रालाही स्पर्श करणारे आहे. त्यांनी मानवी समाजातील अन्याय, विषमता आणि शोषण यांविरुद्ध एक सुस्पष्ट आणि विवेकी भूमिका मांडली. त्यांच्या विचारांत माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या सन्मान, स्वातंत्र्य आणि समानतेचा आग्रह दिसतो. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे केवळ धार्मिक चौकटीत न बसता व्यापक अर्थाने मानवतावादी आणि समाजपरिवर्तनवादी ठरते. त्यांच्या शिकवणीत कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला, कर्मकांडाला किंवा रूढीपरंपरांना स्थान नाही. त्यांनी तर्क, विवेक आणि अनुभव यांच्या आधारे जीवन जगण्याचा संदेश दिला. आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या मूल्यांशीही बुद्धांचे विचार अत्यंत सुसंगत आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची मूलतत्त्वे त्यांच्या तत्त्वज्ञानात स्पष्टपणे दिसून येतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळावी, तिच्या सन्मानाचे रक्षण व्हावे आणि ती स्वाभिमानाने जगू शकेल अशी व्यवस्था निर्माण व्हावी, हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. आजच्या काळात वाढती सामाजिक दरी, आर्थिक विषमता आणि अन्यायाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बुद्धांचे विचार समाजाला अधिक न्याय्य आणि सुसंवादी बनवण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. शिक्षणाच्या क्षेत्रातही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी ज्ञानाला केवळ माहितीपुरते मर्यादित न ठेवता त्याचा उपयोग जीवन समजून घेण्यासाठी आणि आत्मविकासासाठी करावा, असा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, विचार करण्याची आणि सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा दिली. स्वतःच्या अनुभवातून सत्य जाणून घ्या ही त्यांची भूमिका आजच्या वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. शिक्षण हे केवळ रोजगार मिळवण्यासाठी नसून ते व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी असावे, ही त्यांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे.

बुद्धांचे तत्त्वज्ञान मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत उपयुक्त आहे. आजच्या युगात तणाव, नैराश्य, चिंता आणि अस्थिरता या समस्या वाढताना दिसतात. अशा परिस्थितीत 'सम्यक स्मृती' आणि 'सम्यक समाधी' या संकल्पना अत्यंत प्रभावी ठरतात. सजगता (माइंडफुलनेस) आणि ध्यानसाधना यामुळे मन शांत होते, विचार स्पष्ट होतात आणि व्यक्तीला आत्मिक समाधान मिळते. त्यामुळेच आजच्या आधुनिक मानसशास्त्रातही बुद्धांच्या ध्यानपद्धतीला विशेष महत्त्व दिले जाते.

पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी सर्व जीवसृष्टीबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे, संसाधनांचा मर्यादित आणि जबाबदारीने वापर करणे आणि सर्व जीवांचे संरक्षण करणे ही त्यांची शिकवण आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत उपयुक्त ठरते. मानवी विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखण्याची गरज त्यांनी अप्रत्यक्षपणे अधोरेखित केली आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, जिथे विविध संस्कृती, विचारप्रवाह आणि जीवनशैली एकत्र येत आहेत, तिथे सहिष्णुता, संवाद आणि परस्पर आदर या मूल्यांची आवश्यकता अधिकच वाढली आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या सर्व मूल्यांना प्रोत्साहन देते. त्यांनी द्वेषाऐवजी मैत्री, हिंसेऐवजी अहिंसा आणि स्वार्थाऐवजी परोपकार यांचा पुरस्कार केला. त्यामुळेच त्यांच्या विचारांमुळे जागतिक शांतता आणि सौहार्द निर्माण होण्यास मदत होऊ शकते.

गौतम बुद्धांचे जीवन आणि तत्त्वज्ञान हे केवळ भूतकाळातील एक ऐतिहासिक घटना नसून ते आजच्या आणि भविष्यातील समाजासाठीही मार्गदर्शक आहे. त्यांच्या शिकवणीतून आपण केवळ वैयक्तिक जीवनातील समस्या सोडवू शकत नाही, तर समाजातील व्यापक प्रश्नांनाही सामोरे जाऊ शकतो. त्यांनी दिलेला 'मध्यम मार्ग' हा अतिरेक टाळून संतुलित जीवन जगण्याचा मार्ग आहे, जो आजच्या युगात अत्यंत आवश्यक आहे.

वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने आपण बुद्धांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसा या मूल्यांचा अंगीकार केल्यास आपण अधिक शांत, सुसंवादी आणि न्याय्य समाज निर्माण करू शकतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या वर्तनात आणि विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणल्यासच खऱ्या अर्थाने बुद्धांचे तत्त्वज्ञान साकार होईल.

आजच्या पिढीसमोर अनेक आव्हाने आहेत. स्पर्धा, ताण, नैतिक अधःपतन, सामाजिक विषमता आणि पर्यावरणीय संकट. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी केवळ बाह्य उपाय पुरेसे नाहीत, तर अंतर्मुख होऊन स्वतःच्या विचारांमध्ये आणि वर्तनात बदल घडवणे आवश्यक आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या परिवर्तनासाठी एक प्रभावी मार्ग दाखवते. त्यांच्या शिकवणीतून आपण संयम, सजगता, सहानुभूती आणि विवेक या गुणांचा विकास करू शकतो. शेवटी असे म्हणता येईल की गौतम बुद्ध यांचे मानवतावादी तत्त्वज्ञान हे संपूर्ण मानवजातीसाठी एक अमूल्य वारसा आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता, साधेपणा आणि उपयुक्तता यामुळे ते काळाच्या कसोटीवर टिकून राहिले आहेत. वैशाख पौर्णिमेच्या या पवित्र दिवशी आपण त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करून आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प करूया. करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या या मार्गावर चालत आपण अधिक सुंदर, शांततापूर्ण आणि न्याय्य जग निर्माण करू शकतोहीच या दिनाची खरी शिकवण आहे.

-डॉ. राजेंद्र बगाटे
हिंगोली

# महाराष्ट्र राज्य निर्मितीचा संघर्षमय इतिहास



भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तेरा वर्षांनी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही ही ज्या वेळेस स्पष्ट झाले. त्यावेळी प्रचंड जन आंदोलन उभे राहिले. त्यातून राज्य शासनाने केलेल्या गोळीबारात १०६ जण महाराष्ट्र राज्याचे सुपुत्र हुतात्मा झाले. या हौतात्म्य पत्कारलेल्या १०६ जणांचे स्मारक मुंबईत फ्लोरा फाऊंटनजवळ उभारले आहे. त्या वीर जवानांना विनम्र अभिवादन.

लॉर्ड कर्झनने १९०५ मध्ये बंगालची फाळणी केली, परंतु लोकांनी जोर-दार निदर्शने करून ती रद्द करायला भाग पाडले, त्यामुळे न. चि. केळकर यांनी म्हटले आहे की, मराठी भाषा बोलणाऱ्यांची सर्व लोकसंख्या एकाच छत्राखाली असावी, त्यामुळे भाषावार प्रांतरचनेची मागणी केली गेली, तेव्हापासूनच महाराष्ट्र राज्यांची निर्मिती करण्याचे प्रयत्न सुरू झाले. १२ मे १९४६ मध्ये सध्या कर्नाटका - मध्ये असलेला बेळगाव येथे साहित्य संमेलन झाले, आणि तेथे महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. २८ जुलै रोजी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई या ठिकाणी महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली, तिथे सुद्धा मराठी भाषिकांना प्रांत वेगळा असावा असा ठराव संमत करण्यात आला. १७ जून १९४८ रोजीज्ञ न्यायाधीश मा. एस. के. दार अध्यक्षतेखाली दार कमिशनची स्थापना झाली. हळूहळू महाराष्ट्र राज्य निर्मिती होण्यासाठी या सर्व गोष्टी अतिशय महत्त्वाच्या ठरल्या २९ डिसेंबर १९४८ रोजी जी. व्ही. पी. समिती स्थापन करण्यात आली या समितीने भाषावार प्रांतरचना करण्यासाठी तत्त्वः मान्य आहे. पण ही वेळ योग्य नाही अशी शिफारस केली. त्यामुळे जनजागृतीसाठी सेनापती बापट यांनी अनेक प्रभात फेऱ्या काढल्या. असे सांगितले की संयुक्त महाराष्ट्राचा ठराव ५० विरोध ३५ मताने मंजूर झाला, त्यामुळे मुंबई महाराष्ट्रातच असणार असे जनतेने सिद्ध करून दाखविले,

सर्व मराठी भाषिक लोकांचे राज्य स्थापन करण्यासाठी १९५३ मध्ये नागपूर या ठिकाणी करार झाला. या करारानुसार तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणासाठी पुरेसा निधी द्यावा. त्याच्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात राज्य शासनाच्या सेवेत नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. एक अधिवेशन नागपूर या ठिकाणी घेतले जावे.अशी या नागपूर कराराद्वारे हमी देण्यात आली,

मुंबई या ठिकाणी कामगार मैदानावर शंकरराव देव म्हणाले महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करायला आपण प्राणपणाने विरोध करू, त्यामुळे जनतेच्या भावनांना आणि मागण्यांना जनआंदोलनाचे स्वरूप येऊ लागले. यामध्ये शूर महिलाही पुढे होत्या. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून त्या आंदोलनात सहभागी झाल्या सुमतीबाई गोरे,कमलाताई मोरे, सुलताना जोहारी, तारा रेड्डी, चारुशीला गुप्ते, इस्मत चुगताई, दुर्गा भागवत या महिलांनी महाराष्ट्राच्या निर्मितीच्या आंदोलनात उडी घेतली, त्यामुळे हे आंदोलन व्यापक झाले, अनेक राजकीय पक्ष, कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, प्रजा समाजवादी, विविध कामगार संस्था हे सर्व एकत्रित आले आणि ७ नोव्हेंबर १९५५ रोजी कामगारांची सभा झाली, या सभेचे अध्यक्ष कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे होते. या आंदोलनात एस. एम. जोशी यांनी महत्त्वाचे ठराव मांडले. मोरारजी देसाई हे तत्कालीन मुख्यमंत्री होते. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे विधानसभेवर जनसमुदाय मोर्चा घेऊन निघाले. शासनाने बंदी आदेश पुकारले. प्रचंड जमलेल्या जनसमुदायावर लाटी हल्ला करून धुरांचा वापर केला गेला. सायंकाळी ५० हजार लोकांच्या उपस्थितीत जाहीर सभा झाली. कॉम्रेड डांगे यांनी जनसमुदायाला मार्गदर्शन केले, त्यानंतर २१ नोव्हेंबर १९५५ रोजी एक दिवसाचा संप करण्याचा निर्णय घेण्यात आला. संपूर्ण राज्यभर असंतोष खदखदत होता.

६ फेब्रुवारी १९५६ रोजी केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे या ठिकाणी टिळक मंदिरात सभा झाली. या सभेमध्ये सुद्धा महत्वपूर्ण भूमिका अनेक लोकांनी बजावली. त्यात क्रांतिसिंह नाना पाटील, अहिल्याबाई रांगणेकर, मधू दंडवते, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, प्रबोधनकार केशव ठाकरे यांनी एकत्रित येऊन श्रीपाद अमृत डांगे यांना अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून डॉ. त्रां. रा, नरवणे यांना केले. सचिव पदाची धुरा एस. एम. जोशी यांच्याकडे दिली. हे आंदोलन महाराष्ट्रातील वाड्या वस्त्यांवर, खेड्यापाड्यांत पोहोचले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतापगडावरील पुतळ्याचे अनावरण तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते ३० नोव्हेंबर १९५७ रोजी पार पडले. त्यावेळी मराठी भाषिकांच्या भावनांची आणि परिस्थितीची जाणीव त्यांना करून देण्यात आली, त्यामुळे महाराष्ट्र निर्मितीस अनुकूल वातावरण तयार झाले,

काँग्रेसच्या अध्यक्षा इंदिरा गांधी यांनी आपले वजन संयुक्त महाराष्ट्राच्या पारड्यात टाकले. एप्रिल १९६० मध्ये संसदेने मुंबई पुनर्रचना कायदा मंजूर केला, आणि त्यानुसार एक मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. याच काळात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख, शाहीर द. ना. गवाणकर यांनी आपल्या लेखणीतून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली.

तसेच मराठी वृत्तपत्रांनी म्हणजेच प्रबोधन, केसरी, सकाळ, नवाकाळ, नवयुग, प्रभात अशा वृत्तपत्रांनी लोकांपर्यंत स्फूर्तीदायक बातम्या पोहोचल्या. मराठा वृत्तपत्राने महत्त्वाचे कार्य केले. बाळासाहेब ठाकरे यांनी मावळा या टोपण नावाने व्यंगचित्र काढून जन आंदोलनाला व्यापक रूप दिले. अशा या सर्वांच्या कामगिरीतून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे जय जय महाराष्ट्र माझा, असे म्हणण्यास काही हरकत नाही. यावेळी झालेल्या आमदार झुंज गोळीबारात १०६ वीर हुतात्मा झाले. त्यांची आठवण आपल्याला कायमस्वरूपी राहावी त्यांनी सांडलेल्या रक्ताचा थेंब ना थेंब देशाच्या प्रगतीसाठी उपयोगाला यावा, महाराष्ट्र राज्य निर्मिती झाली त्यावेळी या महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड करण्यात आली. आज महाराष्ट्र हे प्रगत राष्ट्र म्हणून ओळखले जाते. येथे विधानसभेवर २८८ व विधान परिषदेत ७८ आमदार घेऊन राज्याचा गाडा हाकला जातो. महाराष्ट्रामध्ये असणारा सांस्कृतिक ठेवा फार मोठा आहे म्हणून निढळाच्या घामाने भिजलेला कणखर राकट देश महाराष्ट्र आहे. असे येथे म्हटले जाते. महाराष्ट्र दिनाची निर्मिती फार कष्टाने व परिश्रमाने झालेली आहे. तसेच आज जागतिक कामगार दिन आहे. महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सर्वांना खूप खूप सदिच्छा.

-प्रा. विठ्ठल बरसमवाड
अध्यक्ष : विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता.मुखेड जि.नांदेड

# कामगारांचा हक्काचा दिवस १ मे



१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधान न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या

१) कायद्याने आठ तासांचा दिवस
२) लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी
३) महिला कामगारांच्या कामावर मर्यादा
४) रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम
५) कायद्याने साप्ताहिक सुट्टी
६) कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा
७) समान कामासाठी समान वेतन

या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बॉंब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले.

१८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, कामगार-कामगारात, राष्ट्रा-राष्ट्रांत, धर्माधर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया.

सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते. लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे.

जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# शंकरनगर परिसरातील जलजीवन मिशनच्या टाक्या ठरल्या शोभेच्या वस्तू; बंद कामे पुन्हा सुरू होणार का?

- पाणी हक्क आहे उपकार नाही
- टाक्या उभ्या, पाणी मात्र गायब; नेमक जलजीवनमध्ये चाललंय तरी काय?

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** शंकरनगर परिसरातील शेळगाव गौरी, किनाळा, बोरगाव थडी, बिजूर, कामरसपली, चिटमोगरा, धुप्पा, टाकळी बु., आळंदी, केरूर, भोपाळा, कुंचेली व रामतीर्थ या गावांमध्ये शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर झालेल्या पाणीपुरवठा योजना सध्या ठप्प अवस्थेत आहेत. उभारण्यात आलेल्या पाणी टाक्या अक्षरशः शोभेच्या वस्तू बनल्या असून, योजनेसाठी आणलेले साहित्य अनेक ठिकाणी धुळखात पडल्याचे चित्र दिसत आहे.

मुख्यमंत्री पेयजल योजनेतील त्रुटी पूर्ण आराखडा व ठेकेदारांच्या मनमानी कारभारामुळे या योजना पूर्णत्वास गेल्या नाहीत, अशी चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. अनेक गावांमध्ये पाईपलाईन व टाक्यांची उभारणी झाली असली तरी प्रत्यक्षात नळांना पाणीच येत नसल्याने नागरिकांना जुन्याच समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

एप्रिल अखेरीस वाढत्या तापमानामुळे शेतातील तसेच घरगुती बोअरवेल आटू लागले आहेत. काही गावांतील विहिरींमध्येही पाण्याची कमतरता भासत असल्याने परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. परिणामी,



महिलांना व ग्रामस्थांना पुन्हा दूरवरून पाणी आणण्याची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे.

टाक्या उभ्या, पण पाणी गायब! जलजीवन मिशनमध्ये नेमकं चाललंय तरी काय?

कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या योजना प्रत्यक्षात निष्क्रिय असल्याने निधीच्या वापराबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पाईपलाईन टाकल्या, कामे दाखवली; मात्र नळ कोरडेच, मग हा पैसा गेला कुठे? असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

ग्रामस्थांच्या मते, काही ठिकाणी वीजपुरवठा, मोटार किंवा देखभालीअभावी योजना बंद पडल्या आहेत. संबंधित विभाग व ग्रामपंचायतींकडून वेळेत दुरुस्ती न झाल्याने ही परिस्थिती उद्भवली असल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, पूर्वीच्या पेयजल योजनेतील विहिरीपर्यंत रस्त्याची तरतूद करून काम सुरू झाले होते; मात्र तेही अर्धवट राहिल्याने दोन्ही योजना अपूर्ण आहेत.

स्थानिक नागरीक व लोकप्रतिनिधींनी तत्काळ हस्तक्षेप करून या कोट्यवधी रुपयांच्या योजनांची शहानिशा करावी व दोषींवर कारवाई करून ग्रामीण भागाला पाणीटंचाईतून मुक्त करावे, अशी मागणी होत आहे.

# पाणी असूनही तळेगावला वीजेअभावी अपुरा पाणी पुरवठा

**उमरी (प्रतिनिधी)–** तळेगावला पाणी असूनही विजेअभावी अपुरा पाणी पुरवठा होत असल्याने गावकऱ्यांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे.

उमरी तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्येचे गाव म्हणून तळेगाव ओळखले जाते. या गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी जलस्वराज्य – २ मधून गोदावरी नदीवरून पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली. त्यानंतर गावातील अंतर्गत पाणी पुरवठा पाईपलाईन व जलशुध्दीकरण केंद्र आणि जलकुंभ उभारण्यात आले असले तरी जलशुध्दीकरण केंद्रावरील क्लोरिनेशनचा प्लॅन्ट योजना कार्यान्वित झाल्यापासूनच बंद असल्याचे सांगण्यात येते. ज्यावेळी ही योजना कार्यान्वित झाली त्यावेळी तळेगाव ग्रामपंचायतीवर डॉ. विक्रम देशमुख यांची एकहाती सत्ता होती. सदरचे काम त्यांचेच कार्यकाळात पूर्ण होऊन ती योजना देखील त्यांचेच काळात हस्तांतरित करण्यात आल्याचे सांगण्यात येते. या योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा कार्यकाळ संबंधित ठेकेदारास पूर्ण न करु देता घाईगडबडीत ही योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरित करुन घेतल्याचा गावातील सुशिक्षित तरुणांचा आरोप आहे.

गोदावरी नदीतील पाणी सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार तेलंगणा राज्यात सोडून दिल्यानंतर बळेगाव बंधाऱ्याची दारे बंद करण्यात आली आहेत. गोदावरी नदी पात्रात सध्या थोपवलेले पाणी असून, त्यात शेवाळे वगैरे होऊन त्या पाण्यास दुर्गंधी येत आहे. ते पाणी नागरिकांना पिण्यास अयोग्य आहे. गोदावरी नदीवरून पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झालेल्या संपूर्ण गावांना ऐन उन्हाळ्यात दुर्गंधीयुक्त पाण्याचा सामना करावा लागतो आहे, परंतु प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होते आहे.

तळेगाव येथे गोदावरी नदीसह नागठाणा विहीर आणि साळवणातील विहिरीवरून पाणी पुरवठा होतो, पण त्या विहिरी शेजारील नाल्याला उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचे पाणी सुटले तरच विहिरीची पाणी पातळी वाढते. पुढचे प्रकल्पाचे पाणी पाळी येईपर्यंत परत काही दिवस गावाला पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे.

उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील १५ व्या वित्त आयोग व इतर शासकीय योजनेतून निधी खर्च करण्यावर निर्बंध लादले गेले आहेत. त्यामुळे नळपट्टी, घरपट्टीच्या वसुलीमधून तळेगावसारख्या मोठ्या गावचा पाणी पुरवठा व्यवस्थापन लावत असताना ग्रामपंचायत अधिकारी यांची दमछाक होते आहे. तळेगाव येथील जनतेसाठी ग्रामपंचायत स्तरावर दोन आरओ प्लॅन्ट कार्यान्वित असून, गावाची पाण्याची मागणी, उन्हाची तीव्रता आणि विजेचा अपुरा पुरवठा, वेळोवेळी लाईट जाण्यामुळे ते प्लॅन्ट पूर्ण वेळ चालत नाहीत. तळेगाव ग्रामपंचायत हद्दीतील जनतेला पाणी असून, पाण्याचे व्यवस्थापन करूनही वीज पुरवठ्याच्या लहरीपणामुळे या गावातील नागरीक हतबल झाले आहेत.

गावातील अनेक सुशिक्षित तरुणांनी राजकीय पुढाऱ्यांना आवाहन करून पाणी पुरवठ्या विषयीराजकारण न करता सर्वांनी एकत्र येऊन आ. राजेश पवार यांचे माध्यमातून तळेगावचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावावा, अशी मागणी केली आहे.

# पोलीसवाडी येथे जनगणना प्रात्यक्षिक सर्वे संपन्न



**लोहा (प्रतिनिधी)–** भारताची जनगणना मेपासून सुरुवात होणार असून, त्यासाठी पर्यवेक्षक व प्रगणक यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षण आज पार पडले. या प्रशिक्षणामध्ये होणारी जनगणना अचूक, पारदर्शकपणे व कार्यक्षमतेने कशी होईल याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

भारताच्या जनगणनेला प्रत्यक्ष फेब्रुवारी २०२७ पासून सुरुवात होत असून, मे महिन्यातील १६ तारखेपासून फक्त घरांची जनगणना होणार आहे. त्यासाठी पारडी येथील सह्याद्री माध्यमिक विद्यालय पर्यवेक्षक व प्रगणक यांचे प्रशिक्षण तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्गदर्शनात मागील तीन दिवसांपासून सुरू झाले आहे. यावर्षीची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार आहे. १६ मे ते १५ जून दरम्यान प्रगणक घरोघरी भेट देऊन माहिती संकलित करतील. त्यासाठी दि.२९ एप्रिल रोजी सकाळी प्रशिक्षणा अंतर्गत आज लोहा तालुक्यातील पोलीसवाडी येथे गाव भेट देऊन प्रत्यक्ष घरांची जनगणना करण्यात येणार आहे.

# किनवटमध्ये 'धावंडा'च्या झाडांना रसायनमिश्रित इंजेक्शन देऊन डिंकाची तस्करी, तस्करांवर कारवाई करा; शिवसेनेची मागणी

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवटच्या आदिवासीबहुल डोंगररांगांमधील जंगलात मौल्यवान 'धावंडा' झाडांना रसायनांचे इंजेक्शन देऊन छुप्या पद्धतीने दररोज डिंक संकलित करून विक्री केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. परराज्यांतील डिंक तस्कर व वनविभागाचे अधिकारी यांच्या संगनमताने हा प्रकार गेल्या तीन–चार वर्षांपासून सुरू असल्यामुळे या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून दोषींवर निलंबनाची आणि फौजदारी कारवाई करण्याची मागणी शिवसेना (उबाठा) पक्षाचे तालुकाप्रमुख राम पाटील व तालुका संघटक विनोद एंड्रलवार यांनी उपवनसंरक्षक नांदेड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.




दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, किनवट, भीमपूर, पितांबरवाडी, घोगदरवाडी, अंबाडी, शिवमरखेडा, धामणदरी, नागझरी, झेंडीगुडा, वसवाडी, वडोली आणि हटकरखोरी या वनक्षेत्रात ही तस्करी मोठ्या प्रमाणात फोफावली आहे. नैसर्गिकरित्या धावंडा झाडापासून १५ दिवसांत १०० ते २०० ग्रॅम डिंक मिळतो. मात्र, तस्करांनी उत्पादन वाढवण्याच्या हव्यासापोटी झाडांना रसायनाची इंजेक्शन देण्यास सुरुवात केली आहे.

या बेकायदेशीर कृत्यामुळे झाडांना ठिकठिकाणी कुऱ्हाडीचे घाव घालून खोल जखमा केल्या जातात, ज्यामुळे अवघ्या ३ ते ४ दिवसांत १ किलोपर्यंत डिंक मिळतो. इंजेक्शनच्या या अतिवापरामुळे झाडांचे आयुष्य कमी होऊन ती वाळून मृत होत आहेत. हा कृत्रिमरित्या काढलेला डिंक मानवी आरोग्यासाठीही घातक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून, धावंडा वृक्षाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे.

स्थानिक आदिवासी मजुरांकडून मिळालेल्या माहितीवरून प्रत्यक्ष जंगलात जाऊन पाहणी केली असता, तिथे परराज्यातील डिंक तस्कर जंगलात ठाण मांडून स्थायिक असल्याचे निदर्शनास आले. किनवटपासून तेलंगणा सीमेपर्यंत हे रॅकेट पसरलेले असून रसायनमिश्रित डिंक संकलन व विक्रीच्या गोरखधंद्यातून किनवट वनविभागातील अधिकारी व परराज्यातील तस्कर लाखोंची माया जमा करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहेत. डिंक तस्करीच्या माध्यमातून होणारी जंगल हानी व नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न लक्षात घेऊन वनविभागाने १५ दिवसांत कारवाई न केल्यास शिवसेना आणि निसर्गप्रेमी नागरिकांच्यावतीने तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा राम पाटील व विनोद एंड्रलवार यांनी दिला आहे.

# खरीप हंगामातील पीक विम्याची उर्वरित रक्कम त्वरित अदा –खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील मंडळनिहाय शिल्लक राहिलेल्या स. न. २०२५ मधील खरीप हंगामातील पीक विम्याची रक्कम त्वरित अदा करावी या मागणीचे निवेदन खासदार रवींद्र चव्हाण यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे दिले आहे



खा. चव्हाण यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, जिल्ह्यातील सन २०२५ मधील खरीप हंगामातील पीक विमा योजनेअंतर्गत अनेक शेतकऱ्यांना मिळणारी भरपाई अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. विविध मंडळांमध्ये पीक विम्याच्या रकमेचे वितरण अपूर्ण राहिल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

सदर प्रकरणाची शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आपण या विषयावर तातडीने दखल घेऊन मंडळनिहाय शिल्लक राहिलेल्या खरीप हंगामातील पीक विम्याची रक्कम त्वरित अदा करण्यात यावी. तसेच संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देऊन ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी, अशीही मागणी खा. रवींद्र चव्हाण यांनी केली आहे.

# धनाजी जोशी यांना अनसंग एव्हरीडे हिरोज पुरस्कार जाहीर

**देगलूर (प्रतिनिधी)–** आर्ट ऑफ लिविंगच्या ४५ वर्षाच्या अखंड सेवा यात्रेनिमित्त आर्ट ऑफ लिविंग महाराष्ट्र राज्य अपेक्स बॉडी छत्रपती संभाजीनगर च्या वतीने देगलूर शहरातील सामाजिक कार्यकर्ते धनाजी मोहनराव जोशी यांचा अनसंग एव्हरीडे हिरोज पुरस्काराने महाराष्ट्र दिन १ मे २०२६ रोजी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

मंत्री संजय शिरसाठ, महापौर समीर राजूरकर, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा आदी मान्यवराच्या उपस्थितीत सन्मान सोहळा पार पडणार आहे.

# अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण रद्द करण्यात यावे या मागणीसाठी चर्मकार महासंघाचे धरणे आंदोलन संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण रद्द करण्यात यावे या मागणीसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हा नांदेड च्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालय येथे धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. याप्रसंगी समाज बांधवांसोबत कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.




निवेदनात म्हटले की, न्या. बदर समितीचा संशोधन अहवाल आजपर्यंत सार्वजनिकरित्या प्रसिद्ध झालेला नाही. ५९ अनु. जातीतील कोणालाही अ. जात प्रतिनिधी म्हणून समितीत सहभागी करण्यात आले नाही. मुख्य सचिव समितीमध्ये जातीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संघटनांना वा व्यक्तींना स्थान देण्यात आलेले नाही. समितीने वर्गीकरणासाठी कुठले आर्थिक, सामाजिक निकष, मा. सुप्रीम कोर्ट निर्णय, अभ्यास गटातील कोणती आणि कशी गृहितके मान्य केलीत ते अनुसूचित जातीतील जनतेला कळलेले नाही. समितीच्या कामकाजात नैसर्गिक न्याय तत्त्वाचा वापर केला नाही. या दोषापोठी न्या. बदर समिती व मुख्य सचिव समिती न्याय संगत नाही. त्यामुळे समितीचे अहवाल गैरलागू होतात. वर्गीकरणानुसार जातीतील विशिष्ट जातीला आरक्षणात प्राधान्य देताना अपुरे प्रतिनिधित्व असलेला ईम्परीकल डाटा हा कालबाह्य झालेला आहे. नवीन २०२७ च्या जनगणनेनुसारचा डाटा उपलब्ध होईपर्यंत वर्गीकरणाचा निर्णय पुढे ढकलण्यात यावा आदी मागण्या करण्यात आल्या.

यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड, महानगराध्यक्ष के. के. गंगासागर, संदीप गोरे, गजानन जोगदंड, नामदेवराव फुलपगार, विशाल बनसोडे, रंजीत सूर्यवंशी, गोविंद माऊली पार्डीकर, संजय शेळके, बालाजी गंगासागर, तानाजी सोनटक्के, सुभाष दुदंबे, हरीश कांबळे, शंकर धडके, संतोष गायकवाड, पंढरी हिवरे, चंद्रकांत सोनटक्के, विशाल घोडेकर, सचिन नरवाडे, सुरेश सोनटक्के, रामदास जमदाडे, भारत अन्नपूर्णे, आनंदा वाघमारे, सुनील सोनसळे, एल. बी. कोकरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# महात्मा फुले समता परिषदेतर्फे ऐतिहासिक भिडेवाडा चित्ररथ व मिरवणूक

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** मुलींच्या शिक्षणासाठी ज्यांनी लढा दिला, त्या महान कार्याची आठवण करून देणाऱ्या भिडेवाडा चित्ररथाचे शुक्रवार, दि. १ मे रोजी सकाळी १० वाजता नांदेडमध्ये आगमण होणार आहे. सर्व समता सैनिक पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रामीण दक्षिण जिल्हाध्यक्ष नारायण अंबुरे व ॲड. संघरत्न गायकवाड यांनी केले आहे.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त जोतीराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहचावेत, यासाठी समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री छगनराव भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली आणि समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खा. समीर भुजबळ, आ. पंकज भुजबळ यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडेवाडा येथे सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेचा भिडेवाडा चित्ररथाचे नांदेड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात येणार आहे.

# कृष्णा पाटील ईद्राक्ष यांची बसव ब्रिगेडच्या जिल्हा सचिवपदी निवड

**बिलोली (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील मौजे भोसी येथील कृष्णा पाटील ईद्राक्ष (भोसीकर) यांची लिंगायत समाजाच्या बसव ब्रिगेडच्या नांदेड दक्षिण जिल्हा सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.



बसव ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून समाजाच्या मूलभूत प्रश्नाला न्याय देण्यासाठी आपण प्रामाणिकपणे संघटनेचे कार्य करणार असल्याची ग्वाही कृष्णा पाटील भोसीकर यांनी दिली आहे.

# एन.एम.एम.एस परीक्षेत शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी, ता. मुखेड, जि. नांदेड संचालित शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सिडको नांदेडच्या विद्यार्थ्यांनी केंद्र शासन आयोजित राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत एन.एम.एम.एस.मध्ये यशाची परंपरा कायम राखली. इ.आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी घेण्यात आलेल्या NMMS परीक्षेत या शाळेतील ५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी १२ विद्यार्थी केंद्र सरकारच्या एन.एम.एम.एस.शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत.



यामध्ये एस.सी. प्रवर्गातून जिल्ह्यातून २ री कु. अंजली आनंदराव पिंपळे तर जिल्ह्यातून खुला प्रवर्गातून ९ वा क्रमांक कु. सिद्धी मदनराव सूर्यवंशी या विद्यार्थिनीने यश मिळवून विद्यालयाचे नाव उंचावले आहे.

एन.एम.एम.एस शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले विद्यार्थी कु. सिद्धी मदनराव सूर्यवंशी, दत्तात्रय राघवेंद्र कुलकर्णी, कु. अश्विनी दत्ता लोंढे, कु. अंजली आनंदकुमार पिंपळे, विजय सटवा भालेराव, श्रद्धा नवनाथ कांबळे, कु. शताक्षी बालाजी वरकड, आयुष अवधूत गजेले, कु. तनुश्री अमोल बुजूर्गे, कु. सृष्टी शिवानंद परळे, उत्कर्ष केशव जाधव, सुमित संगप्पा नागठाणे पात्र झाले आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव, मुख्याध्यापक रवी जाधव, पर्यवेक्षक व्ही. एस. पाटील, समन्वयक एस. एम.देवरे, शाळेचे मुख्य लिपीक व्ही. एस. वाघमारे, परीक्षा प्रमुख सी. जी. पावडे, तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

# निखिल कन्स्ट्रक्शनचा भोंगळ कारभार; राष्ट्रीय महामार्ग १६१ बनला मृत्यूचा सापळा

## १२१ कोटींचा निधी खर्चूनही काम अपूर्ण; जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रवाशांचा जीव धोक्यात

**भोकर (प्रतिनिधी)–** भोकर–बारसगाव ते भोकर–रहाटी या तेलंगणा सीमेपर्यंतच्या राष्ट्रीय महामार्ग २६१ (सुधारित १६१) च्या कामात निखिल कन्स्ट्रक्शन कंपनीने केलेल्या दिरंगाईमुळे कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे समोर आले आहे. कामाची मुदत संपून वर्ष लोटले तरी महामार्ग आजही अर्धवट अवस्थेत असून, या कामामुळे आजवर अनेक निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी आता जोर धरत आहे.





अंदाजे ५६ किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी शासनाने १२१ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मंजूर केला आहे. या कामाला चार ते पाच वर्षांपूर्वी सुरुवात झाली होती. नियमानुसार हे काम दोन वर्षांपूर्वीच पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, मुदत संपून एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटला असला, तरी महामार्गाचे काम पूर्ण झालेले नाही. कोट्यवधींचा निधी खर्च होऊनही रस्ता पूर्ण न झाल्याने हा निधी नेमका गेला कुठे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महामार्गाच्या कामातील निकृष्ट दर्जाचे पुरावे ठिकठिकाणी पाहायला मिळत आहेत. शहरातील वळण रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुलाची केवळ एक–दोन वर्षांतच सळाखे उघडे पडून अक्षरशः चाळणी झाली आहे. महामार्गाच्या सीसी रोडला जागोजागी मोठे तडे गेले असून भेगा पडल्या आहेत. विशेषतः मातुळ पुलाचे झालेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून, रस्ता आणि पुलाच्या सांध्यामध्ये धोकादायक गॅप पडला आहे. सध्या तेलंगणा बॉर्डर जवळ होत असलेले बोगस काम यामुळे वाहनचालकांना अंदाज येत नाही आणि भीषण अपघात घडत आहेत.

राष्ट्रीय महामार्ग विशेष प्रकल्प विभागाकडे डोंगरे टी–पॉईंट ते बारसगावपर्यंतच्या देखभालीची (मेंटेनन्स) जबाबदारी असून हे काम निखिल कन्स्ट्रक्शनकडे देण्यात आले आहे. मात्र, भोकरपासून बारसगावपर्यंत अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले असून रस्त्याची दुरवस्था झाली आहे. असे असतानाही महामार्ग विशेष प्रकल्प विभागाचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे.

# युवा

लग्न हा कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय असतो. लग्नाच्या पवित्र बंधनात बांधले गेल्यावर दोन व्यक्तीच नाही तर दोन परिवार एकत्र येतात. आनंदाप्रमाणे जबाबदाऱ्याही येतात. अनेक लोक गुडघ्याला बाशिंग बांधून रेडी असतात. पण काही जण लग्नाच्या तणावात असतात. नवीन जबाबदारी आपण पार पाडू शकू की नाही ? अनेक लोकांमध्ये लग्नाबाबत सकारात्मक विचार आणि प्रश्न असतात यालाच प्री वेडिंग ताण असे म्हणतात. चला तर मग जाणून घेऊयात हे नक्की आहे तरी काय...



# चिंता लग्नापूर्वीची...



लग्न हा कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय असतो. लग्नाच्या पवित्र बंधनात बांधले गेल्यावर दोन व्यक्तीच नाही तर दोन परिवार एकत्र येतात. आनंदा प्रमाणे जबाबदाऱ्याही येतात. अनेक लोक गुडघ्याला बाशिंग बांधुन रेडी असतात. पण काही जण लग्नाच्या तणावात असतात. नवीन जबाबदारी आपण पार पाडू शकू की नाही? अनेक लोकांमध्ये लग्नाबाबत सकारात्मक विचार आणि प्रश्न असतात यालाच प्री वेडिंग ताण असे म्हणतात. चला तर मग जाणून घेऊयात हे नक्की आहे तरी काय. लग्नाबद्दल चिंताग्रस्त होणे ही एक सामान्य गोष्ट आहे. परंतु जेव्हा एखादी व्यक्ती लग्नाच्या तयारीची किंवा त्यानंतरच्या आयुष्याबद्दल खूप काळजी करू लागते तेव्हा तो चिंतेचा शिकार होतो, ज्याला लग्नापूर्वीची चिंता किंवा प्री वेडिंग ताण म्हणतात. या चिंतेचे मुख्य कारण म्हणजे दोघांनाही लग्नानंतरच्या आयुष्याची काळजी वाटते. मग तो कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांचा असतो. पण या गोष्टी योग्य पद्धतीने हातळणे गरजेचे असते.

- जोडीदारासोबत बोला : जर तुम्हाला लग्नाच्या तयारीबद्दल किंवा त्यानंतरच्या आयुष्याबद्दल खूप तणाव वाटत असेल, तर सर्वोत्तम पर्याय म्हणजे तुमच्या जोडीदारासोबत बसून त्याबद्दल बोलणे. तुम्हा दोघांनी तुमचे आयुष्य एकत्र घालवायचे आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच तुम्ही या गोष्टीची तयारी करणे गरजेचे आहे.
- परिस्थिती स्वीकारा : आयुष्याच्या प्रत्येक स्थरावर ताण आणि संकट येतात. त्यामुळे तुमचा तणाव कमी करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे परिस्थितीचा स्वीकार करणे. यासह आपण भविष्यासाठी मानसिकदृष्ट्या तयार होऊ शकाल आणि चिंता टाळू शकाल. ज्या गोष्टीचा तुम्ही जास्त विचार कराल तेवढा तुम्हाला त्रास होईल.
- मित्राची मदत घेऊ शकता : आपल्या सर्वांच्या आयुष्यात असा मित्र असतो, ज्याच्याशी बोलणे आपल्याला हलके किंवा चांगले वाटते. अशा परिस्थितीतही तुम्ही तुमच्या मित्राशी बोलून तणाव कमी करू शकता. याकाळात मित्र तुम्हाला खूप चांगली मदत करु शकतात.
- काही महिने आधीच तयारी सुरू करा : लग्नाची तयारी जर तुम्ही का ही महिन्यांआधीपासून सुरू केली तर तुम्हाला कमी त्रास होईल. ड्रेस, ॲक्सेसरीज किंवा इतर गोष्टींबाबत शेवटपर्यंत तयार नसतात. तो सतत या गोष्टीचा विचार करतो, ज्यामुळे तो तणावग्रस्त होऊ लागतो. म्हणूनच तुमच्या लग्नाच्या पोशाखाची तयारी काही महिने आधीच करून घेणे आणि तणावमुक्त राहणे चांगले.
- परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करू नका : प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही कमतरता नक्कीच असते. एक व्यक्ती कलेत तर दुसरी नृत्यात चांगली असू शकते. म्हणून लक्षात ठेवा की तुम्ही प्रत्येक गोष्टीत परिपूर्ण होऊ शकत नाही. परिस्थिती समजून घेऊन शांततेने पुढे जा. ज्या गोष्टी जशा आहेत तशा स्विकारा. यामुळे तुम्हाला फायदा होईल.

# लग्नासाठी नोकरी करणारी मुलगी हवी?



**भारतीय समाजात महिलांना चूल आणि मूल या दोन गोष्टींपुरते मर्यादित मानले जाते. पण आज स्त्रिया सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या पावलावर पाऊल टाकून खंबीरपणे काम करत आहेत. पण या महिलांची संख्या फार कमी मानली जाते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पुरुषांची असुरक्षितता. महिला जर बाहेर काम करण्यासाठी गेल्या तर घर आणि मुलं कोण सांभाळणार. पण समाजात महिलांना नेहमीच सक्षम मानले गेले आहे. फक्त घर सांभाळणे आणि मुलांना जन्म देणे या जबाबदाऱ्या महिलेच्या नसून अशा परिस्थितीत, जर तुम्हीही लग्नासाठी नोकरी करणारी मुलगी शोधत असाल तर या पाच गोष्टींसाठी स्वतःला तयार करा...**



- कामं वाटून घ्या : तुमच्या आयुष्यात एक नवीन व्यक्ती आली आहे. तुमची पत्नी नोकर नाही त्यामुळे तुमची कामं वाटून घ्या. मग ते गृहकर्ज असो किंवा कपडे धुण्याचे. असे केल्याने नोकरी करणाऱ्या पत्नीशी तुमचे संबंध नेहमीच चांगले राहू शकतात.
- मुलाची जबाबदारी एकत्रितपणे उचलावी : एका नवीन जीवाला या जगात आणण्यासाठी आई आणि बाबा दोघंही खूप महत्त्वाची असतात. त्यामुळे मुलाची जबाबदारी एकत्रितपणे उचलावी बहुतेक पुरुष मुलांना सांभाळण्यास सक्षम नसतात. पण तुम्ही पत्नी देखील काम करत आहे. ही गोष्ट लक्षात घ्या त्यामुळे तुमच्या होणाऱ्या पत्नीला मुलं सांभाळण्यासाठी मदत करा.
- कोणताही निर्णय एकट्याने घेऊ नका : लग्न झाल्यावर अनेक गोष्टी बदलतात. त्यामुळे कोणताही निर्णय एकट्याने घेऊ नका. यामुळे तुमच्यात वाद होऊ शकतात. यामुळे तुमच्या दोघांमध्ये फक्त संघर्ष होईल आणि अंतर येईल.
- जास्त अपेक्षा करू नका : अनेक वेळा असे घडते की पुरुष नोकरी करणाऱ्या महिलांशी विवाह करतात. पण जेव्हा त्यांना असे कळते की त्यांना नात्यात आदर मिळत नाही तेव्हा ते महिलेला काम सोडण्यासाठी विचारतो. पण असे केल्यास महिल्यांना त्यांच्या स्वप्नांचा त्याग करावा लागतो. पण तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत असे वागू नका.
- प्रेमासोबतच आदरही आवश्यक आहे : नोकरदार महिला इतर महिलांप्रमाणेच भावनिक असतात. पण यासोबतच प्रत्येक परिस्थितीला एकटीने सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांना अपमानित करू नका. त्यामुळे प्रेमासोबतच त्याचा आदर करा.

### घरकामात मदत करावी

जर तुम्हाला नोकरी करणारी पत्नी हवी असेल तर तुम्ही घरातील सगळी कामं करण्यासाठी तयार राहा. या गोष्टीमध्ये काहीच गैर नाही. पत्नी जर नोकरी करत असेल तर ऑफिसला जाण्याआधी आणि परत आल्यानंतर घरची सगळी कामं एकटीनेच करावीत अशी अपेक्षा करणं चुकीचं आहे . तुमच्यासाठी हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की ती तुमच्यापेक्षा घरातील कामात चांगली असू शकते, परंतु ती सकाळ संध्याकाळ न थांबता काम करणारी मशीन नाही.

# चुकीच्या व्यक्तीसोबत लग्न करत असल्याचे सहा संकेत!



**मॅच्युरिटी म्हणा किंवा जबाबदारी, हा एक असा शब्द आहे, जो वेळीच लक्षात आला तर माणसाचे जीवन यशस्वी होते. जबाबदारीबद्दल बोलायचे तरती तर शिकवून कळत नाही ती वेळेनुसारच येते आणि परिस्थितीनुसारच शिकावी लागते. मात्र, मुली या सर्व गोष्टी खूप लवकर शिकतात, पण मुलांनी त्यांच्या जबाबदाऱ्या ओळखणे खूप गरजेचे आहे. कारण लग्नानंतर त्यांची जबाबदारी पूर्णपणे दुप्पट होते. अशा परिस्थितीत पतीने परिपक्व आणि जबाबदार कसे असावे हे जाणून घेतले पाहिजे. पण ही गोष्ट सुद्धा खरी आहे की काही लोकांना जबाबदार होण्यासाठी जास्त प्रयत्न करावे लागत नाहीत. पण सगळ्यांच्या बाबतीत असं होत नाही. काही मुले लग्नानंतरही प्रत्येक गोष्टीसाठी इतरांवर अवलंबून असतात. त्यांनाही त्यांचे काम करण्यात आळस वाटतो. जर तुम्हाला शंका असेल की तुमचा नवरा देखील या श्रेणीत येतो, तर आज आम्ही तुम्हाला अशी काही लक्षणे सांगणार आहोत जी दर्शवितात की तुम्ही एका बेजबाबदार व्यक्तीशी लग्न केले आहे.**


- घरच्या कामात मदत न करणे : आजकालच्या मुलींची अपेक्षा असते की आपल्या पतीने सुद्धा घरकामात आपल्याला मदत करावी आणि ही अपेक्षा अजिबात चुकीची नाही. कारण ऑफिसचे काम सांभाळून घरचे काम करणे ही एकटी पत्नीची जबाबदारी नाही. पण तुमचा नवरा मात्र तुम्हाला घरकामात मदत करत नसेल वा तुम्हाला होणारा त्रास पाहूनही त्याचे मन विरघळत नसेल तर समजून घ्या की त्याला अजूनही त्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव नाही. तो अजूनही लग्नाआधी होता तसाच वागतो आहे.
- सतत घरी उशिरा येणे : अधूनमधून कामावर उशीर होणे अगदी सामान्य आहे. पण तुमचा नवरा नेहमी उशिरा येतो आणि कोणत्याही गोष्टीसाठी वेळेवर पोहोचत नसेल, तर हे एक बेजबाबदार व्यक्ती असण्याचेच लक्षण आहे. अशा व्यक्तीसोबत तुमचे जीवन व्यर्थ आहे.
- सगळं काही तुम्हालाच करावं लागतं : पत्नी आपल्या पतीसाठी सर्व काही करण्यास तयार होते. पण त्या बदल्यात पतीने तिची काळजी घेतली नाही तर पत्नीचा हिरमोड होणे साहजिक आहे. तुमच्या जीवनात तुमच्या पतीचे काहीच योगदान नसेल तर तो एक बेजबाबदार व्यक्तीच आहे.
- वचन न पाळणे : वचन मोडणे ही केवळ नात्यासोबतची प्रतारणाच नाही तर एक त्रासदायक भावना सुद्धा आहे. जर तुमचा नवरा तुम्हाला एखादे वचन वा आश्वासन देतो पण वेळ आली की ते विसरतो आणि जे मनाला हवे तेच करतो. तुमच्या मानाचा अजिबात विचार करत नाही तर हे लक्षण आहे की तुम्ही अशा पुरुषाशी लग्न केले आहे ज्याला तुमच्या मनाची अजिबात पर्वा नाही.



- उधळपट्टी करणे : लग्नानंतर कोणत्याही पतीला आर्थिक नियोजन हे करावेच लागते. पण जर तुमचा नवरा खर्चीक असेल आणि भविष्यासाठी त्याच्याकडे कोणतीही बचत नसेल तर तुमचे भविष्य खरोखरच धोक्यात आहे. निवृत्तीनंतर आजारपण किंवा घर चालवण्यासाठी पैसा खूप महत्त्वाचा असतो. यात केवळ पत्नीनेच नव्हे तर पतीनेही मोठे योगदान दिले पाहिजे. जर तुमचा नवरा पैसा अजिबात वाचवत नसेल तर ते त्याच्या बेजबाबदारपणाचे लक्षण आहे.

# लग्न दबावाखाली नकोच!

**असं म्हणतात की जोड्या या स्वर्गातच बनतात. जो जोडीदार आपल्या नशिबात लिहिलेला असतो तोच आपल्याला मिळतो. ही गोष्ट जरी खरी असली तरी स्वतःसाठी जोडीदार कसा निवडावा हे सुद्धा आपल्या हातातच असतं. अनेक व्यक्ती अशा असतात ज्यांना इतरांच्या दबावाखाली लग्न करावं लागतं, मात्र अशा अनेक व्यक्ती असतात ज्यांना जोडीदार निवडण्याची सुवर्णसंधी मिळते. अशीच संधी जर तुम्हाला मिळाली तर त्याचं नक्की सोनं करा. खास करून तरुणींनी या दृष्टीने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण त्या आपल्या घरातल्या व्यक्तींना सोडून दुसऱ्याच्या घरात जातात. अशावेळी आपण ज्या व्यक्तीची निवड करतो आहोत तो खरंच आपल्यासाठी योग्य व सुरक्षित आहे का हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. असे नाही केले तर मग आयुष्यभर पश्चाताप करण्याची वेळ येऊ शकते. आज जाणून घेऊया अशा काही गोष्टी ज्या प्रत्येक तरुणीने आपल्या जोडीदारात शोधल्याच पाहिजेत. शिवाय ग्रीन फ्लॅग दिसल्याशिवाय मुलांनीही रिलेशनशिपमध्ये पुढे जाण्याचा निर्णय घेऊ नये.**



## रेड फ्लॅग आणि ग्रीन फ्लॅग

रेड फ्लॅग जोडीदाराच्या त्या सवयी असतात, ज्यामुळे तुम्ही दुःखी किंवा अस्वस्थ होतात आणि तुम्हाला पुन्हा पुन्हा त्याच्यावर संशय निर्माण होतो. एकंदर त्या व्यक्ती बाबत खात्री राहत नाही. याचा सरळ अर्थ असे दाखवतो की हे नाते संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. ग्रीन फ्लॅगचा अर्थ असा की जोडीदाराच्या त्या गोष्टी ज्या दर्शवतात की हे नाते तुम्ही दुसऱ्या स्टेजकडे घेऊन जाऊ शकता आणि बिनधास्त त्या व्यक्तीशी लग्न करण्याचा निर्णय घेऊ शकता. तो तुम्हाला नक्की आयुष्यभर सांभाळेल.

## त्यालाही आत्मविश्वास हवा

वैयक्तिक किंवा व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी, व्यक्तीमध्ये आत्मविश्वास असणे खूप महत्वाचे आहे. जर तुमच्या प्रियकराला तुमच्यावर किंवा या नात्यावर विश्वास नसेल, तर याचा अर्थ त्याला तुमच्यासोबत भविष्य दिसत नाही. लग्नासाठी नेहमी अशी व्यक्ती निवडा जी तुमच्यावर फक्त प्रेमच करत नाही तर अवघे आयुष्य तुमच्यासोबत व्यतीत करण्यासाठी ती व्यक्ती ठाम असायला हवी. अशी क्वालिटी जर तुम्हाला तुमच्या आताच्या जोडीदारात दिसत असले तर लग्नाचा विचार करण्यास हरकत नाही.

## ध्येयावर विश्वास ठेवणारा

तुमच्या ध्येयांना आणि स्वप्नांना आधार देणारा जीवनसाथी जर तुम्हाला मिळाला तर तुम्ही खरंच खूप भाग्यवान असाल. म्हणूनच, त्याच्यासोबत भविष्याची स्वप्ने पाहण्याआधी आपल्या प्रियकरामध्ये ही गुणवत्ता आहे का ते पाहणे महत्वाचे आहे. जर तुमचा प्रियकर तुमच्या निर्णयांकडे लक्ष देत नसेल किंवा तुमच्या इच्छांना निरर्थक म्हणत असेल तर तो तुमचा जीवनसाथी होण्यास योग्य नाही असेच संकेत त्यातून मिळतात. कारण जोडीदार असा हवा जो तुमची प्रत्येक गोष्ट आपली म्हणेल.

## मनमोकळा संवाद

संवाद ही आनंदी नात्याची गुरुकिल्ली मानली जाते. जिथे दोन लोक एकमेकांचे ऐकायला तयार असतात तिथे संघर्षाची शक्यता कमी असते. अशा परिस्थितीत जर तुम्ही आणि तुमचा प्रियकर कोणत्याही गोष्टीबाबत जर मनमोकळा संवाद साधत असाल तर याचा अर्थ तुमच्यामधील बॉन्डीन्ग आणि केमिस्ट्री खूप सुंदर आहे आणि तुम्ही हे नाते आयुष्यभरासाठी जपू शकता.

## प्रभावाखाली येणारा नसावा

अशा लोकांवर विश्वास ठेवणे कठीण आहे जे चटकन एखाद्याच्या प्रभावाखाली येतात. म्हणूनच बॉयफ्रेंडमध्ये आपल्या भावी पतीला शोधण्यापूर्वी नेहमी त्याचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे तपासा. तो कोणाच्याही बोलण्यात लगेच येत नाही ना, किंवा छोट्याश्या गोष्टीवरून सुद्धा संशयी वृत्तीने वागत नाही ना ते तपासा. जर त्याला अशी सवय असले तर लग्नानंतर तुमचे आयुष्य उध्वस्त व्हायला वेळ काग्णार नाही. कारण अशी लोकं कधीच सारासार विचार करणारी नसतात आणि त्याचा त्रास स्वतःला होतो.

## चुकांची जबाबदारी घेणारा

आपल्या चुका मान्य करणे हे एक उत्तम व्यक्ती असण्याचे लक्षणे आहे. जे आपल्या चुका मान्य करत नाहीत, ते सर्व चुकांसाठी इतरांना दोष देतात. मग अशा व्यक्तीसोबत आयुष्यभर आनंदाने जगता येईल का? हा प्रश्न स्वतःला विचारा आणि अशा जोडीदारापासून दूरच राहा.

## तुमच्यासाठी वेळ काढणारा



जर तुमचा जोडीदार त्याच्या बिझी वेळापत्रकातूनही तुमच्यासाठी वेळ काढत असेल तर याचा अर्थ तुम्ही त्याच्यासाठी महत्त्वाचे आहात. त्याच्या आयुष्यात तुमची किंमत खूप मोठी हे आणि तुमचे स्थान अव्वल आहे. ही गोष्ट चांगल्या जोडीदाराचेही लक्षण आहे. त्यामुळे अशा व्यक्तीसोबत तुम्ही सुखी संसाराची स्वप्ने पाहू शकता.

# हेलिकॉप्टरमधून प्रथमच नौदल जहाजविरोधी मिसाईल यशस्वी प्रक्षेपित



**नवीदिल्ली(प्रतिनिधी)** – डीआरडीओ आणि नौदलाने बंगालच्या उपसागरात हेलिकॉप्टरमधून कमी पल्ल्याचे नौदल जहाजविरोधी क्षेपणास्त्र यशस्वीरित्या प्रक्षेपित केले. हेलिकॉप्टरमधून काही सेकंदांच्या अंतराने दोन क्षेपणास्त्रे डागण्यात आली, ज्यांनी अचूकपणे जहाजाच्या खालच्या भागावर मारा केला. याद्वारे भारताने आपल्या साल्वो लाँच क्षमतेची चाचणी घेतली. म्हणजेच, कमी कालावधीत एकाच लाँचरमधून अनेक क्षेपणास्त्रे डागण्याची क्षमता. हे तंत्रज्ञान शत्रूच्या रडार प्रणालींना चकमा देऊ शकते. ओडिशातील चंदीपूर चाचणी केंद्रावर स्थापित रडार, इलेक्ट्रो-ऑप्टिकल प्रणाली आणि टेलिमेट्रीच्या साहाय्याने क्षेपणास्त्राच्या संपूर्ण उड्डाणाचा आणि लक्ष्याचा मागोवा घेण्यात आला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले की, या क्षेपणास्त्राच्या विकासा-मुळे लष्कराच्या क्षमतां-मध्ये लक्षणीय वाढ होईल.

क्षेपणास्त्राने जहाजाच्या त्या भागाला लक्ष्य केले, जो आदळल्यास नुकसानीसाठी सर्वात असुरक्षित होता. हे क्षेपणास्त्र बूस्टर लाँच प्रणाली आणि स्वतंत्र उड्डाण टिकवून ठेवणाऱ्या प्रणालीने सुसज्ज आहे. याव्यतिरिक्त, लक्ष्य ओळखणे, मार्ग निश्चित करणे आणि उंची कायम राखण्यासाठी अनेक तंत्रज्ञान एकत्रित करण्यात आले आहेत. या क्षेपणास्त्रामध्ये एक अशी प्रणाली आहे, जी त्याला उड्डाणादरम्यान नवीन माहिती प्राप्त करण्यास अनुमती देते. गरज पडल्यास ते दिशाही बदलू शकते. हे क्षेपणास्त्र डीआरडीओच्या विविध प्रयोगशाळा आणि भारतीय उद्योगांनी संयुक्तपणे विकसित केले आहे. आता त्याचे उत्पादन देशांतर्गत केले जात आहे.

शनिवारी, डीआरडीओ आणि नौदलाने एका नवीन युद्धनौका प्रकल्पासाठी हायड्रोडायनॅमिक कामगिरी आणि मॉडेल चाचणी पूर्ण केली. हे काम नौदल विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रयोगशाळा (छडढङ) आणि नौदलाच्या युद्धनौका डिझाइन ब्युरोने संयुक्तपणे केले. या चाचण्यांमध्ये जहाजाचा वेग, पाण्यातील वर्तन, इंजिनची शक्ती आणि वळण्याची क्षमता यांसारख्या महत्त्वाच्या बाबींचे मूल्यांकन करण्यात आले. याचे निकाल आंतरराष्ट्रीय मानकांनुसार असल्याचे आढळले.

डीआरडीओचे अध्यक्ष समीर व्ही. कामत यांनी प्रकल्पाचे निकाल नौदल अधिकारी संजय साधू यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी डीआरडीओ आणि नौदलाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथे डीआरडीओने नवीन चिलखती प्लॅटफॉर्मचे अनावरण केले. हे ट्रॅक असलेले आणि चाके असलेले दोन्ही प्रकारचे आहेत. लष्कराच्या गरजा लक्षात घेऊन त्यांची रचना करण्यात आली आहे. हे प्लॅटफॉर्म ३० मिमी क्रूलेस टरेटने सुसज्ज आहेत. ते शक्तिशाली इंजिन आणि ऑटोमॅटिक ट्रान्समिशनने सुसज्ज आहेत, ज्यामुळे त्यांचा वेग आणि क्षमता वाढते. तसेच, त्यांना सर्व बाजूंनी संरक्षक कवचही आहे.

हे प्लॅटफॉर्म जमिनीवर तसेच पाण्यातही कार्यरत राहू शकतात. ते हायड्रो जेट तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत, ज्यामुळे त्यांना पाण्यात चालवणे सोपे होते. ते रणगाडाविरोधी मार्गदर्शित क्षेपणास्त्रे डागण्यासही सक्षम आहेत. सध्या या प्लॅटफॉर्ममध्ये अंदाजे ६५ टक्के स्वदेशी सामग्रीचा वापर केला जातो आणि हे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची योजना आहे.

# रितेश देशमुखच्या 'राजा शिवाजी' सिनेमाची रिलीजपूर्वीच शंभर कोटींहून अधिक कमाई



**मुंबई (प्रतिनिधी)**–अक्षय कुमारचा सिनेमा 'भूत बंगला' सध्या जोरदार चर्चेत आहे. गेल्या १० दिवसांत या सिनेमानं थिएटर्समध्ये १०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. मात्र, 'भूत बंगला' बॉक्स ऑफिसवर अपेक्षित असलेली जादू निर्माण करण्यात अपयशी ठरला आहे. अशातच एका आगामी सिनेमानं, जो अजून रिलीजही झालेला नाही, त्यानं 'भूत बंगला'ला पछाडलं आहे. या सिनेमानं आतापर्यंत तब्बल ७० कोटींचा नफा कमावला आहे. रितेश देशमुखच्या 'राजा शिवाजी' या सिनेमानं प्रदर्शित होण्यापूर्वीच सिनेसृष्टीत मोठी खळबळ उडवून दिली आहे.

रिलीजपूर्वीच 'राजा शिवाजी'नं १९३ कोटींची कमाई कशी केली? सध्या सगळीकडे रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' सिनेमाचीच चर्चा रंगली आहे. 'राजा शिवाजी' सिनेमाच्या 'नॉन-थियेट्रिकल' हक्कांचे एकूण मूल्य १९३ कोटी रुपये असल्याचं सांगण्यात येत आहे. ही रक्कम सिनेमाच्या बजेटपेक्षा खूपच जास्त आहे. परिणामी, सिनेमा प्रदर्शित होण्यापूर्वीच निर्मात्यांना मोठा नफा मिळवणं शक्य झालंय.

'राजा शिवाजी'चे OTT हक्क ९५ कोटी रुपयांना विकले गेलेत. तर, म्युझिक राइट्समधून २८ कोटी रुपये मिळालेत, तर सॅटेलाईट राइट्स ७० कोटी रुपयांना निश्चित करण्यात आलेत. या तीनही रक्कमांची बेरीज केली तर, 'राजा शिवाजी'नं प्रत्यक्ष प्रदर्शनापूर्वीच एकूण १९३ कोटी रुपयांचा व्यवसाय केलाय. या सिनेमाचं बजेट अंदाजे १२० कोटी रुपये असल्याचं मानलं जातंय. त्यामुळे, प्रोडक्शन टीमनं आतापर्यंतच ७० कोटी रुपयांहून अधिक नफा कमावला आहे.

'राजा शिवाजी' हा सिनेमा छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित आहे. यामध्ये रितेश देशमुख मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या सिनेमाबाबत प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे. अनेकजण याकडे एक ऐतिहासिक गाथा म्हणून पाहत असले, तरी काहीजण सिनेमाचा ट्रेलर आणि त्यातील सीन्सबाबत प्रश्न उपस्थित करत आहेत. सिनेक्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, प्रदर्शनापूर्वीच इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेला व्यवसाय हा कोणत्याही सिनेमासाठी एक सकारात्मक संकेत असतो. ओटीटी प्लॅटफॉर्म्स, म्युझिक कंपन्या आणि टीव्ही चॅनल्सनी या सिनेमावर आपला विश्वास दर्शवला आहे. जर या सिनेमानं थिएटर्समध्ये चांगली कामगिरी केली, तर तो एक 'ब्लॉकबस्टर' सिनेमा ठरू शकतो. 'राजा शिवाजी' हा सिनेमा १ मे रोजी थिएटर्समध्ये प्रदर्शित होणार आहे.

# जामिनावर सुटताच आरोपीचा महिलेला धर्मांतरासाठी दबाव अन् जिवे मारण्याची धमकी

**कोल्हापूर (प्रतिनिधी)**– कोल्हापुरातील शिरोली पुलाची येथील एका महिला अत्याचाराची घटना ताजी असतानाच, त्याच भागातील एका गुन्हेगाराने मणुसकीला काळीमा फासणारे कृत्य केले आहे. अत्याचाराच्या गुन्ह्यात जामिनावर सुटलेल्या एका आरोपीने पीडित महिलेला पुन्हा गाठून तिचा विनयभंग केला असून, तिला धर्मांतरासाठी धमकावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी शाहूपुरी पोलिसांनी गैबीसाहेब दस्तगीर लिंगरे (वय ४२, रा. शिरोली पुलाची) याला बेड्या ठोकल्या आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी गैबीसाहेब लिंगरे याच्यावर संबंधित महिलेने यापूर्वी अत्याचाराचा गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात तो कारागृहात होता, मात्र अलीकडेच तो जामिनावर बाहेर आला होता. जामिनावर सुटल्यानंतर त्याने पुन्हा पीडितेला त्रास देण्यास सुरुवात केली.

बुधवारी कोल्हापूर शहरातील महावीर कॉलेज परिसरात पीडिता जात असताना, लिंगरे याने तिला रस्त्यात अडवले. त्याने तिला जबरदस्तीने रिक्षात बसवून तिचा विनयभंग केला. इतकेच नव्हे तर, जर तू पोलिसात तक्रार केलीस तर तुला मारून टाकीन. पोलीस आणि हिंदुत्ववादी लोक माझे काहीच करू शकत नाहीत, अशा शब्दात त्याने पीडितेला धमकावले.

पीडित महिलेने सोशल मीडियाच्या माध्यमातून एक व्हिडिओ प्रसिद्ध केला आहे. यामध्ये तिने धक्कादायक आरोप केले आहेत की, संशयित आरोपी तिच्यावर धर्मांतर करण्यासाठी सतत दबाव टाकत होता. तसेच, हा व्हिडीओ माझा शेवटचा व्हिडीओ असू शकतो. मला भयंकर मानसिक त्रास होत आहे, असे महिलेने म्हटले आहे. या प्रकरणात कठोर कारवाई करण्याची मागणी देखील महिलेने केली आहे. दरम्यान, या व्हिडिओमुळे कोल्हापूर जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

# महाराष्ट्र दिनी मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा

## ■ मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला एक्सप्रेस-वे आता अधिक वेगवान आणि सुरक्षित

**मुंबई(प्रतिनिधी)**–महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) यांच्या वतीने यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या क्षमता वाढीअंतर्गत उभारण्यात आलेल्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा महाराष्ट्र दिनी १ मे रोजी पार पडणार आहे. राज्यातील वाहतूक व्यवस्थेला नवे बळ देणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार आहे.

या 'मिसिंग लिंक' चे उद्घाटन शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी दु. १२:३० वाजता मिसिंग लिंक वरील पूल क्र.१, खोपाली एक्झिटजवळ, यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग, जि. रायगड या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद**

मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला एक्सप्रेस-वे आता अधिक वेगवान आणि सुरक्षित होत आहे. मिसिंग लिंकमुळे वेळ आणि इंधन वाचविणारा सुरक्षित आणि वेगवान प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. मिसिंग लिंक जगातील सर्वात रुंद बोगदा (२३.५ मीटर) असून लोणावळा तलावाच्या १८० मीटर खालून खोदलेला बोगदा आहे. या ठिकाणी ६५० मीटर केबल-स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच रस्त्यावरील पूल पायलॉन उंची (१८२ मीटर) असून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वांत रुंद बोगदा म्हणून नोंद झालेली आहे.

हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवासाचा कालावधी लक्षणीयरित्या घटवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठी सुधारणा होणार आहे.

राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासातील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, या प्रकल्पामुळे आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीलाही गती मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

# एक्स्प्रेसवेवर धावत्या कारला आग लागून अल्पवयीन मुलीसह ५ जण जिवंत जळाले

**नवीदिल्ली (वृत्तसंस्था)** –दिल्ली-मुंबई द्रुतगती महा-मार्गावर अलवरच्या मौजपूर येथे एका धावत्या कारला आग लागली. या अपघातात पाच जण जिवंत जळाले.

आग विझवल्यानंतर, बचाव पथकांना इर्टिगा कार-मध्ये फक्त हाडे सापडली. आग लागताच चालकाने गाडीतून उडी मारली होती. त्याला गंभीर अवस्थेत जयपूरला हलवण्यात आले आहे.


## नोकरीची सुवर्णसंधी

ड्रायफ्रूट्स, टूटी फ्रूटी चेरी, आईस्क्रीमसाठी जेली तसेच मीठा पान चटणी यांच्या मार्केटिंगसाठी मेहनती व सुशिक्षित मुलांची आवश्यकता आहे.

**कामाचे ठिकाण :- नांदेड शहर व जिल्हा**
**पगार : रू. १५,००० ते रू. २०,००० पर्यंत**
बिझनेसवर आकर्षक बोनस देखील दिला जाईल
उमेदवाराकडे स्वतःचे टू-व्हीलर असणे आवश्यक आहे
**इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा:**
**फ्रेंड्स जर्दा स्टोअर, जुना मोंढा, नांदेड**
**मो. नं. ८६८८९६९७५५**



## टी. सी. हरवली आहे

माझी संजयकुमार रामराव निरपणे या नावाची इयत्ता ४ थी पासची टी. सी. कंधार ते नांदेड दरम्यान प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील मोबाईलवर संपर्क साधावा.
मो. ९७३०४८८३६५


# राज्यातील १२ वी बोर्ड परीक्षेचा उद्या निकाल जाहीर होणार; विद्यार्थ्यांना ऑनलाईन पाहता येणार



**मुंबई(प्रतिनिधी)**– राज्यातील १२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल शनिवार २ मे रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाकडून जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर, विद्यार्थ्यांना दुपारी १ वाजता ऑनलाईन वेबसाटईवर पाहाता येणार आहे. काही दिवसांपूर्वी सीबीएसई बोर्डाचा निकाल जाहीर झाला होता. त्यानंतर, राज्यातील १२ बोर्ड परीक्षेच्या निकालाच्या तारखेकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारीमार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल शनिवार, दिनांक २ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येणार आहे. सदर निकाल अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी आपला आसन क्रमांक व इतर आवश्यक तपशीलांच्या आधारे निकाल पाहता येईल. यासंदर्भात अधिक माहिती देण्यासाठी शनिवार, २ मे रोजी सकाळी ११ वाजता राज्य मंडळाच्या कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. बारावीचा निकाल शनिवारी जाहीर होणार असून सकाळी ११ वाजता बोर्डाची पत्रकार परिषद होणार आहे. त्यामध्ये, राज्याचा निकाल, कोणत्या विभागात किती निकाला आणि एकूण विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने निकाला जाहीर होईल. त्यानंतर, दुपारी १ वाजता विद्यार्थ्यांना ऑनलाइन निकाल पाहता येणार आहे. mahahsscboard.in या संकेतस्थळावर हा निकाल पाहता येणार आहे.

**सीबीएससी बोर्डाच्या शाळांत तीन भाषा**

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता सहावीपासून सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये तीन भाषा विद्यार्थ्यांना शिकाव्या लागतील तर परदेशातून भारतीय शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन भाषांच्या अटीतून सूट असेल त्यासोबतच मंडळाने पुढील वर्षीपासून गणित आणि विज्ञानासाठी नेहमीच्या ऐंशी गुणांच्या परीक्षा व्यतिरिक्त आणखी एक पर्याय दिला आहे. ही परीक्षा २५ गुणांची असून त्यात संबंधित विषयाची आकलन क्षमता कसोशीने तपासली जाणार आहे.

# 'आरएसएस'च्या मुख्यालयात 'रेडिओक्टिव्ह' पदार्थ टाकल्याच्या पत्राने खळबळ

**नागपूर (प्रतिनिधी)**– नागपूरमधील महाल येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय तसेच रेशीमबाग येथील डॉ. हेडगेवार स्मृतिमंदिर परिसरात 'रेडिओक्टिव्ह' पदार्थ टाकल्याचा दावा एका निनावी पत्राद्वारे करण्यात आला आहे. या पत्रासंदर्भातील तपशील समोर आल्यानंतर नागपूर पोलिस, सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली आहे. नागपूर पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांना दोन दिवसांपूर्वी हे पत्र पाठविण्यात आले होते. या पत्रात 'डीएसएस' नावाच्या संघटनेने हे पत्र पाठविले असल्याचे म्हटलं आहे. या पत्रात संघाबाबत आक्षेपार्ह भाषेचादेखील वापर करण्यात आला आहे. या निनावी पत्रामुळे खळबळ उडाली आहे.

इंग्रजी भाषेतील संबंधित पत्र 'डीएसएस' नावाच्या संघटनेने पाठविल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यात संघ मुख्यालय, रेशीमबाग स्मृतिमंदिर, मेट्रो या ठिकाणी 'सिझीयम-१३७' ही 'रेडिओक्टिव्ह' पावडर टाकल्याचे लिहिण्यात आले होते. संबंधित पावडर ही प्रचंड विनाशकारी असून त्यामुळे अनेक जण बाधित होतील अशी धमकी देण्यात आली.


## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री रत्नाकर संभाजी कानगुले रा. खुरगाव ता. जि. नांदेड यांनी दिनांक ३०.०१.२०२६ रोजी या कार्यालयात त्यांचे मुलीचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव पुनम रत्नाकर कानगुले वय १७ रा. खुरगाव ता. जि. नांदेड यांचा राहते घरे खुरगाव ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक १०.११.२००८ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक ३०.०१.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसील कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुक्तीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक – १८.०२.२०२६
स्थळ – नांदेड

**तहसीलदार नांदेड करिता**


# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना राज्यपालांचे अभिवादन



**मुंबई**–राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी लोकभवन मुंबई येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे तसेच लोकभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# 'बार्टी'कडून यूपीएससी-सीएपीएफ मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना २५ हजारांचे आर्थिक साहाय्य

**मुंबई (प्रतिनिधी)** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्या माध्यमातून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सीएपीएफ) परीक्षेत यश मिळवून मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी आर्थिक साहाय्य योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत मुलाखत परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी प्रती विद्यार्थी २५ हजार रुपये आर्थिक साहाय्य देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन 'बार्टी'ने केले आहे.

संघ लोकसेवा आयोगाने १७ एप्रिल रोजी केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सीएपीएफ) मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर केला असून या निकालात राज्यातील मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जातीच्या उमेदवारांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. या योजनेंतर्गत पात्र उमेदवारांना मुलाखती पूर्व-तयारीसाठी प्रवासखर्च, निवास, भोजन तसेच इतर शैक्षणिक साहित्याचा खर्च भागविण्यासाठी प्रति विद्यार्थी २५ हजार रुपये एकरकमी आर्थिक साहाय्य देण्यात येणार आहे. योजनेचा सविस्तर तपशील, जाहिरात व अर्जाचा नमुना 'बार्टी'च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करावा. अधिक माहितीसाठी 'बार्टी'च्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


## टी.सी. हरवली

माझी केदार शंकर सरकाळे या नावाची इयत्ता तिसरी पासची टी. सी. गणेश नगर ते हबीब टॉकीज दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. ज्यांना कुणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर आणून द्यावी ही विनंती.

**पत्ता-शंकर बाबुराव सरकाळे**
**यशवंतनगर, नांदेड**
**मो. ९४२१८४९११३८**



## Change In Name

MY OLD NAME IS **BHANDARWAR VENKAT** WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME **BHANDARWAR VENKAT LAXMAN** HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER NEW NAME.PLEASE CONSIDER THE SAME.

Adress :-Ram nagar Kinwat Tq.Kinwat Dist.Nanded (MH) 431804.



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# नांदेड विमानतळ विकासासाठी प्रस्ताव तत्काळ सादर करा -पालकमंत्री अतुल सावे

## जिल्हाधिकारी कार्यालयात विमानतळ विकास कामांबाबत आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड विमानतळ अधिक सुसज्ज करण्यासाठी धावपट्टी विस्तार, अतिरिक्त सुविधा व सेवा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी तत्काळ सर्वेक्षण करून शासनाकडे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात विमानतळ विकास कामांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी खासदार अशोक चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, विमानतळ संचालक अमरदीपसिंग सेहरा, संचालक व्यवस्थापक निलेश सोनटक्के यांसह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सध्या नांदेड येथून सात ठिकाणी विमानसेवा सुरू असून लवकरच ती दहा ठिकाणी वाढविण्याचे नियोजन आहे. वाढत्या विमान वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर एकाच वेळी दोन ते तीन विमाने उतरल्यास अडचणी निर्माण होऊ शकतात, त्यामुळे पर्यायी धावपट्टीसाठी आवश्यक जागेचे सर्वेक्षण करून नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री अतुल सावे यांनी दिल्या.

याशिवाय विमानतळ विस्तारीकरणासाठी जागा, विमानतळ परिसरातील उंच बांधकामे, अनधिकृत बांधकामांवर कारवाई, तसेच संरक्षण भिंतीलगतच्या भागांचे सर्वेक्षण महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, विमानतळ प्राधिकरण यांनी संयुक्तरित्या करावे. प्रवाशांना सर्व सुविधा उपलब्ध होतील यादृष्टीने लवकरात लवकर प्रस्ताव तयार करून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्याकडे सादर करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सुविधा, विमानतळ परिसरातील सुरक्षा यासह विमानतळापर्यंत प्रवाशांना टॅक्सी सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी खासदार अशोक चव्हाण यांनी यावेळी केली.

# नांदेडला सर्वाधिक पीकविमा; पहिल्या टप्प्यात ८१३.९३ कोटी मंजूर

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा प्रशासनाच्या समन्वय आणि सूक्ष्म नियोजनामुळे प्रधानमंत्री पीकविमा योजने अंतर्गत नांदेड जिल्ह्यास सर्वाधिक ८१३.९३ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. उर्वरित २१ महसूल मंडळांची रक्कम प्रलंबित आहे. एकूण विमा मंजुरी ९०० कोटींपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे.



जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी पीक विमा निकष पुर्तता करणे कामी आवश्यक असलेल्या पीक कापणी प्रयोगाची वस्तुनिष्ठ अमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील विविध विभागांचे १६ समन्वय अधिकारी यांची नियुक्ती केली होती. जिल्हाधिकारी हे स्वतः पीक कापणी प्रयोग पर्यवेक्षणासाठी जातीने हजर होते. पीक कापणी प्रयोगांची पारदर्शक आणि वस्तुनिष्ठ अंमलबजावणी, तांत्रिक पूर्तता, विमा कंपनीच्या आक्षेपांचे निराकरण आणि तिन्ही विभागांचा प्रभावी समन्वय यामुळे नांदेडला राज्यात सर्वाधिक पीकविमा मंजूर झाला आहे.

या बाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांचे कार्यालयाकडून खरीप पिकांचे काढणी कालावधीत कृषी, महसूल व ग्रामविकास या तिन्ही यंत्रणेकडील पीक कापणी प्रयोगावर पीक विमा कंपनीकडून घेण्यात आलेल्या आक्षेपांबाबत निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी सुकाणू समितीची बैठक घेऊन समस्यांचे निराकरण केल्यामुळे नांदेडला विमा नुकसान भरपाई रक्कम मिळण्यास मदत झाली आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी केलेले सूक्ष्म नियोजन व सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि वस्तुनिष्ठ पीक कापणी प्रयोगांमुळे नांदेड जिल्ह्यास राज्यात सर्वाधिक पीक विमा रक्कम मंजुरी बाबत यशस्वी कामगिरी शक्य झाली.

# मटका अड्ड्यांवर पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाची धाड; ८ जणांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड शहरात मटका अड्ड्यांवर पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाची धाड पडली असून, या धाडीत ८ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली. यामध्ये ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नांदेड परिक्षेत्रात कार्यरत असलेल्या अवैध व्यवसायविरोधी पथकास नांदेड शहरातील शिवाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीत मटका सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती.

या माहितीवरून गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ रोजी पथकाने नांदेड शहरातील नवीन मोंढा भागातील जय गुरुदेव पान शॉप जवळच्या लिंबाच्या झाडाखाली छापा टाकला. या छाप्यात मटका खेळताना ४ इसम मिळून आले. यातील सर्व इसमांना ताब्यात घेऊन त्यांची तपासणी केली असता त्यांच्याकडे १५,७७० रुपयांची रोकड व १५,५०० रुपयांचे ३ मोबाईल असा एकूण ३१,२७० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला.

या पथकाने ताब्यातील इसमाना मटका मालकांबाबत विचारपूस केली असता, त्यांनी सदर मटक्याचे मालक हे अब्बास रा. नई आबादी, शिवाजीनगर, नांदेड, शेख जमीर इतवारा, नांदेड व मटका बुकी चालविणारे, संजय गायकवाड, रा. भारत गॅस गोडाऊन जवळ, नवीन मोंढा नांदेड व ईश्वर जाधव, रा. खोब्रागडे नगर, नवीन मोंढा, नांदेड हे असल्याचे सांगितले. या बाबत मटका खेळणाऱ्या व मटका मालकांविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# ‘स्वारातीम’ विद्यापीठात ‘कला आणि संस्कृती उन्हाळी शिबीर २०२६’चे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ललित व प्रयोगजीवी कला संकुल आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘कला आणि संस्कृती उन्हाळी शिबीर २०२६’चे आयोजन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. या शिबिरातून विद्यार्थ्यांना कला, संस्कृती आणि सर्जनशीलतेचा अनुभव देण्याचा उद्देश आहे.

या शिबिरात नृत्य, नाट्य, गायन व वादन, छायाचित्रण तसेच चित्रकला अशा विविध कलाप्रकारांचा समावेश असून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. धमाल मोज, गंमत, शिक्षण आणि सर्जन या संकल्पनेवर आधारित हे शिबीर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे ठरणार आहे.





शिबिराचा कालावधी ५ ते २० मे २०२६ असा असून, दररोज सायंकाळी ४.३० ते ६.३० या वेळेत सत्रे होणार आहेत. ५ ते १५ वयोगटातील मुला-मुलींसाठी हे शिबीर खुले आहे. प्रवेशासाठी अंतिम तारीख ४ मे २०२६ असून प्रवेश शुल्क रुपये १५०० निश्चित करण्यात आले आहे.

या शिबिरासाठी इच्छुकांनी ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. शिवराज शिंदे ( ९०९९९४५९९६) आणि प्रा. राहुल गायकवाड (९०४९०४३८४४) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

या उपक्रमाचे संयोजन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर तसेच ललित व प्रयोगजीवी कला संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी कला शिकून सर्जनशील होण्याची संधी या शिबिरातून उपलब्ध होणार असल्याने पालक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

# जिल्हा युवा पुरस्कार जाहीर; आज वितरण

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्याचे युवा धोरण सन २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासननिर्णय १२ नोव्हेंबर २०१३ अन्वये जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या उल्लेखीत कार्याचा गौरव व्हावा आणि युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्ह्यातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थांकडून जिल्हा युवा पुरस्कार सन २०२४-२५ या वर्षाच्या युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्राप्त प्रस्तावाची जिल्हास्तर युवा निवड समितीच्या वतीने छाननी करून अंतिम पुरस्कारार्थींची नांवे पुढीलप्रमाणे आहेत.

सन २०२५-२६ (युवक) करिता लवकुश मधुकर जाधव (युवक) व साधना कैलाश गायकवाड (युवती) यांची जिल्हास्तर युवा पुरस्कार निवड समितीमार्फत निवड करण्यांत आली असून या पुरस्काराचे स्वरुप १० हजार रोख, सन्मानचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असून, सदरचा पुरस्कार महाराष्ट्र दिन दि. १ मेच्या मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

त्याकरिता जिल्ह्यातील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी, राज्य क्रीडा पुरस्कारार्थी, विविध एकविध खेळ संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू मुले-मुली, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमी यांनी दिनांक १ मे २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता पोलीस परेड मैदान, वजिराबाद, नांदेड येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# शेषराव पाटील घोगरे यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– वाघाळा येथील ज्येष्ठ नागरिक तथा सेवानिवृत्त ग्रामसेवक शेषराव नानाराव पाटील घोगरे यांचे वाघाळा येथील निवासस्थानी ३० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त शिक्षक पांडुरंग नानाराव पाटील घोगरे व सदाशिव नानाराव पाटील घोगरे यांचे ते बंधू होत.



# विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे गुरुवार, दि. ३० एप्रिल रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, डॉ. अनिकेत मुळे, केशव गवाळे, शिवराम लुटे, गोविंद हंबर्डे, शिवाजी चांदणे, शेख बशीर, सुधाकर शिंदे, संदीप एडके, नारायण गोरे, तुकाराम बारसे, दीपक हंबर्डे, बंकट ठाकूर, चंद्रकांत हंबर्डे,, बबन हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# मिरवणुकीत कर्णकर्कश आवाजात डीजे; भीमजयंती मंडळाच्या ४ पदाधिकाऱ्यांसह डी.जे. चालकावर गुन्हा दाखल

**भोकर (प्रतिनिधी)** –डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत पोलीस प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डी.जे. वाजवल्याप्रकरणी भोकर पोलिसांनी कडक कारवाई केली आहे. याप्रकरणी मंडळाचे पदाधिकारी आणि डी.जे. चालक अशा एकूण ५ जणांविरुद्ध ३० एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी भोकर शहरात जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली होती. सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेच्या दरम्यान पंचशील बुद्ध विहार ते माऊली मंगल कार्यालय या मार्गावर डी.जे.चा मोठ्या आवाजात वापर सुरू होता. या आवाजाचा परिसरातील नागरिकांना त्रास होत असल्यामुळे ‘डायल ११२’ वर तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

मिळालेल्या तक्रारीनुसार कर्तव्यावर असलेल्या पोलीस अंमलदारांनी घटनास्थळी जाऊन डी.जे. बंद करण्याच्या सूचना दिल्या. मात्र, आरोपींनी पोलिसांच्या आदेशाला न जुमानता उलट मोठ्या आवाजात डी.जे. चालूच ठेवला. मिरवणुकीपूर्वीच प्रशासनाने या पदाधिकाऱ्यांना ‘भारतीय नागरिक सुरक्षा संहिता’ कलम १६८ अन्वये लेखी नोटीस देऊन डी.जे. न वापरण्याचे आदेश दिले होते, तरीही त्यांनी जाणीवपूर्वक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पीएसआय मोहन राठोड यांनी फिर्याद दिली. त्यावरून ३० एप्रिल २०२६ रोजी भारतीय न्याय संहिता कलम २२३ व ३(५) नुसार प्रतीक दिगंबर कदम (अध्यक्ष, भीम जयंती मंडळ), शुभम दिगंबर पवार (उपाध्यक्ष), आशिष पुरभाजी पावडे (सचिव),संतोष आनंद बनसोडे (डी.जे. मालक, रा. गणेश नगर, नांदेड),मॅडी सुभाष कांबळे (डी. जे. ऑपरेटर, रा. विष्णुपुरी, नांदेड) या पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्हास्तरावर १ ते ८ मे दरम्यान ‘थॅलेसेमिया मुक्त अभियान सप्ताह’ साजरा होणार

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागातर्फे ‘एक पाऊल थॅलेसेमियामुक्तीकडे’ या अभियानाच्या वर्षपूर्तीनिमित्त आणि ‘जागतिक थॅलेसेमिया दिनाचे’ (८ मे) औचित्य साधून संपूर्ण जिल्ह्यात १ मे ते ८ मे २०२६ या कालावधीत ‘थॅलेसेमिया मुक्त अभियान सप्ताह’आयोजित करण्यात आला आहे.

राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या नियोजनाने हा सप्ताह व्यापक स्वरूपात राबविला जाणार आहे.

१ मे रोजी आरोग्य संस्थांमध्ये थॅलेसेमिया निर्मूलनाची शपथ घेणे आणि डिजिटल कॅम्पेनची सुरुवात केली जाईल. २ मे शाळा व महाविद्यालय जनजागृती: तरुणांमध्ये लग्नापूर्वी तपासणीची गरज पटवून देण्यासाठी व्याख्याने आयोजित केली जातील. स्थानिक नेते/ सेलिब्रिटी यांचा सहभाग वाढवला जाईल.

३ मे आरोग्य कर्मचारी प्रशिक्षण: आशा, NM आणि MΠΩ यांना लवकर निदानासाठी आणि फील्ड-लेव्हल रिपोर्टिंगसाठी विशेष प्रशिक्षण दिले जाईल. ४ मे गर्भवती महिला व कुटुंब सल्ला: क्लिनिकमध्ये गर्भवती मातांचे समुपदेशन आणि हाय-रिस्क जोडप्यांची यादी तयार केली जाईल. ५ मे रुग्ण सहाय्य व रक्तदान : थॅलेसेमिया रुग्णांसाठी विशेष रक्तदान शिबिरे आणि मोफत औषध वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंतीनिमित्त किनवटमध्ये स्वच्छता अभियान

**किनवट (प्रतिनिधी)** –राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किनवट नगर परिषदेतर्फे स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान सप्तपदी स्वच्छतेची या उपक्रमांतर्गत शहरात व्यापक स्वच्छता व नाले साफसफाई अभियान राबविण्यात येत आहे. गुरुवार, दि. ३० एप्रिल रोजी प्रभाग क्रमांक १ रामनगर येथून या अभियानाची सुरुवात करण्यात आली.



या अभियानांतर्गत किनवट नगर परिषद क्षेत्रातील सर्व प्रभागांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून, नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती केली जात आहे.

नगराध्यक्षा सौ. सुजाता विनोद एंड्रूलवार यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमात मुख्याधिकारी मुगाजी काकडे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, युवानेते करण एंड्रूलवार, नगरसेवक, नगरपालिका कर्मचारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

शहरातील प्रत्येक प्रभागात स्वच्छता अभियान सातत्याने राबविण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्षा सौ. सुजाता एंड्रूलवार यांनी दिली.

# पायाभूत कामे व पुनर्विकासामुळे रेल्वे गाड्यांमध्ये तात्पुरते बदल

**नांदेड (प्रतिनिधी)** –रेल्वेमार्फत विविध पायाभूत सुविधा सुधारणा व प्रवासी सुविधा उन्नतीकरणासाठी सुरू असलेल्या कामांमुळे काही रेल्वे गाड्यांच्या वेळापत्रकात व मार्गात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

**नंदीग्राम एक्स्प्रेस काही दिवस दादरपर्यंतच**

मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाच्या पुनर्विकास कामांमुळे प्लॅटफॉर्म क्रमांक १६ व १७ साठीचा ट्राफिक ब्लॉक ८५ दिवसांवरून १०८ दिवसांपर्यंत वाढविण्यात आला आहे. यामुळे गाडी क्र. ११००२ बल्लारशाह छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस ही गाडी २६ एप्रिल ते १८ मे या कालावधीत दादरपर्यंतच धावेल. दादर ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दरम्यान रद्द असेल.

**तिरुपती यार्ड येथे ट्रॅफिक ब्लॉक**

तिरुपती यार्ड येथे ब्रिज क्र. १५४ चे पाईप प्रकारातून बॉक्स प्रकारात रूपांतर करण्यासाठी २७ एप्रिल २०२६ ते २ मे २०२६ या कालावधीत ट्राफिक ब्लॉक घेण्यात येणार आहे. हे काम ६ तासांचे ६ ब्लरॉक्स घेऊन पूर्ण करण्यात येईल. यामुळे गाडी क्र. १६७३३ रामेश्वरमओखा एक्सप्रेस ही गाडी १ मे रोजी काटपाडीमेल पक्कमरेणीगुंटा मार्गे वळविण्यात येईल. यामुळे ही गाडी या दिवशी तिरुपती रेल्वे स्थानक येथे थांबणार नाही, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com